# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ३२०

विभाग :- बांधकाम

दिनांक : ७/१ /२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मध्ये ओमनगर मैदानात आरोग्य केंद्र इमारत उभारणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड क्र. ८५ मध्ये ओमनगर मैदानात दवाखाना अस्तित्वात आहे. सदर दवाखाना तत्कालीन नगरपरिषद काळात बांधलेले होते. त्याची जागा कमी पडत आहे. त्यामुळे वाढीव आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी जागेची आवश्यकता आहे. त्यासाठी दवाखाना जवळ असलेल्या मोकळया जागेची पहाणी मा. आयुक्त सो. ह्यांनी केलेली होती. त्यांनी दिलेल्या मौखिक सुचनेनुसार मोकळया जागा उपलब्ध करुन त्यामध्ये बांधकाम करणेबाबत सूचना दिलेल्या होत्या.

मा. आयुक्त सो. यांचे सुचनेनुसार प्रत्यक्ष पहाणी करुन सदर कामाचे रक्कम रु. २९५८१९९/- चे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. जागेचे क्षेत्रफळ १२.०० मी. लांब X ६.०० मी. रुंद आहे. इमारत आर.सी.सी. तळमजला स्वरुपाची आहे. त्यामध्ये बाथरुम व ॲल्यूमिनीयम पार्टीशनची व्यवस्थेची तरतूद करण्यात आलेली आहे. कामाचे सन २०१९-२० चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्य दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब उपरोक्त नमूद ठिकाणी आरोग्य सेवा सक्षमीकरणासाठी इमारत बांधकाम करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) अन्वये मा. आयुक्त यांच्या मान्यतेने सदर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती एच मधील वॉर्ड क्र. ८५ मध्ये ओमनगर मैदानात आरोग्य केंद्र इमारत उभारणे कामी अंदाजपत्रकीय रु. २९५८१९९ /- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रीया करणेत यावी

[signature] ७/१/२०२१
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार (पुर्व)**
**ता. वसई, जि. पालघर**

---

**प्रशासकीय ठराव क्र. ३२१** **विभाग ः - सार्व. वाचनालय**

**दि. ७/१/२०२१**

**<u>प्रस्तावाचा विषय ः-</u>** सन २०२०-२१ वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयांसाठी लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करणेकामी मुदतीत प्राप्त झालेल्या तीन ई-निविदाधारकां पैकी जास्त सवलंत देणा-या ई निविदेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

**<u>प्रस्तावाचा मजकूर ः-</u>**

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयांनसाठी सन २०२० - २१ वर्षाकरिता लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करण्यासाठी वार्षिक अंदाजपत्रकात ग्रंथ खरेदी या लेखाशिर्षातर्गत रक्कम रू.१५ लक्ष इतकी तरतूद करण्यांत आलेली आहे. दि.१०/१२/२०२० रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. २६१ अन्वये रक्कम रू.६ लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिलेली आहे. वाचनालयांसाठी लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके वार्षिक ई- निविदा पध्दतीने खरेदी केल्यास खरेदीच्या रक्कमेवर महानगरपालिकेस मिळणारी सूट गृहीत धरून खरेदी करण्यासंबधी दि. १२/१२/२०२० रोजी दै. जागल्या व दै. सकाळ या वृत्तपत्रामध्ये तसेच महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहीर ई -निविदा दि.११/१२/२०२० रोजी जावक क्र. नविशम/साप्रवी/४३६/२०-२१ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार दिलेल्या मुदतीत पुढील ३ ई-निविदा प्राप्त झालेल्या असून. तीन निविदाकारानचे अ.क्र.१ चे तांत्रिक लिफाफे दि. २४/ १२ /२०२० रोजी उघडण्यात आले व अ.क्र.२ चे वित्तीय बाबींचे लिफाफे दि. ३०/ १२ /२०२० रोजी उघडण्यात आले. प्राप्त टक्केवारी दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | निता बुक एजन्सी | अमित प्रकाशन | जयेश एजन्सी |
|---|---|---|---|---|
| अ. | सन २०२० -२१ या वित्तीय वर्षाकरीता सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी मराठी भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | | | |
| १. | मॅजेस्टिक प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| २. | नवचैतन्य प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| ३. | मेहता पब्लिशिंग हाऊस | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| ४. | कॉन्टिनेन्टल प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| ५. | राजहंस प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| ६. | मनोरमा प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| ७. | डिंपल प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| ८. | इतर प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | २५% |

| अ.क्र | तपशिल | निता बुक एजन्सी | अमित प्रकाशन | जयेश एजन्सी |
|---|---|---|---|---|
| ब. | सन २०२० -२१ या वित्तीय वर्षाकरीता सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी हिंदी भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | | | |
| १. | भारतीय ज्ञानपीठ , नई दिल्ली | **<u>३६%</u>** | २७% | ५% |
| २. | अखंड ज्योतीसस्थान , मथुरा | **<u>३६%</u>** | २७% | ५% |
| ३. | मेहता पब्लिशिंग हाऊस | **<u>३६%</u>** | २७% | २५% |
| ४. | हंस प्रकाशन , इलाहाबाद | **<u>३६%</u>** | २७% | ५% |
| ५. | पुजा प्रकाशन , मुंबई | **<u>३६%</u>** | २७% | ५% |
| ६. | ग्रंथ अकादमी , नई दिल्ली | **<u>३६%</u>** | २७% | ५% |
| ७. | इतर प्रकाशन | **<u>३६%</u>** | २७% | १०% |

| अ.क्र | तपशिल | निता बुक एजन्सी | अमित प्रकाशन | जयेश एजन्सी |
|---|---|---|---|---|
| क. | सन २०२० -२१ या वित्तीय वर्षाकरीता सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी इंग्रजी भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | | | |
| १. | The Random House Publishing Group ltd, London | **<u>३६%</u>** | २७% | १ % |
| २. | Harper Collins Publishers, London | **<u>३६%</u>** | २७% | ३ % |
| ३. | Dorchester Publishing, New york | **<u>३६%</u>** | २७% | ५ % |
| ४. | Penguin Group, USA | **<u>३६%</u>** | २७% | १ % |
| ५. | Times Warner Book Group, UK | **<u>३६%</u>** | २७% | १ % |
| ६. | Other Publications | **<u>३६%</u>** | २७% | ३ % |

| अ.क्र | तपशिल | निता बुक एजन्सी | अमित प्रकाशन | जयेश एजन्सी |
|---|---|---|---|---|
| ड. | सन २०२० -२१ या वित्तीय वर्षाकरीता सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी गुजराती भाषेतील कथा, कादंबरी, लेख, चरित्र, व इतर पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | | | |
| १. | अशोक शहा नवभारत साहित्य प्रकाशन | ३६% | २७% | २ % |
| २. | भारतीय विदयाभवन गुर्जर प्रकाशन , अहमदाबाद | ३६% | २७% | २ % |
| ३. | मेहता पब्लिशिंग हाऊस | ३६% | २७% | २५% |
| ४. | श्री.लक्ष्मी पुस्तक भांडार , अहमदाबाद | ३६% | २७% | ५ % |
| ५. | बुक मार्क प्रकाशन | ३६% | २७% | ५ % |
| ६. | प्रभुत्व विकास ट्रस्ट प्रकाशन , वडोदरा | ३६% | २७% | ५ % |
| ७. | इतर प्रकाशन | ३६% | २७% | ५ % |

| अ.क्र | तपशिल | निता बुक एजन्सी | अमित प्रकाशन | जयेश एजन्सी |
|---|---|---|---|---|
| इ. | सन २०२० -२१ या वित्तीय वर्षाकरीता सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी शैक्षणिक पुस्तकांच्या प्रकाशनाच्या मुळ किंमतीवर किती टक्के सूट देणार ? | | | |
| १. | के.सागर प्रकाशन | ३६% | २७% | २० % |
| २. | व्हिजन ॲकेडमी | ३६% | २७% | २० % |
| ३. | स्टडी सर्कल पब्लिकेशन | ३६% | २७% | २० % |
| ४. | अनिरूध्द पब्लिकेशन | ३६% | २७% | २० % |
| ५. | चेतक पब्लिकेशन | ३६% | २७% | २० % |
| ६. | निराला प्रकाशन | ३६% | २७% | २० % |
| ७. | दिपस्तंभ प्रकाशन | ३६% | २७% | २० % |
| ८. | इतर प्रकाशन | ३६% | २७% | २० % |

**ठराव ः-**

वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक व वसई विरार शहर महानगरपालिका यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार **वरील** प्राप्त तीन ई निविदाधारकांमधील **मे.निता बुक एजन्सी** या निविदाधारकांचे **तक्ता क्र.अ** मधील **घटक क्र. १ ते ८, तक्ता क्र.ब** मधील **घटक क्र. १ ते ७, तक्ता क्र.क** मधील **घटक क्र. १ ते ६, तक्ता क्र.ड** मधील **घटक क्र. १ ते ७, तक्ता क्र.इ** मधील **घटक क्र. १ ते ८** मध्ये नमुद केलेले तक्केवारीचे दर इतर निविदाधारकांन पेक्षा तुलनात्माक दृष्टया **(सर्व घटकांनसाठी ३६% )** जास्त सवलत देणारे आहेत. **मे.निता बुक एजन्सी यांचे** दर महानगरपालिकेच्या फायद्याचे असून त्यांच्या ई निविदेस व त्यांनी भरलेल्या सवलतीच्या टक्केवारी दरास प्रशासकीय मंजूरी देत आहे.तसेच त्यांचे मंजूर सवलतीच्या दराने सर्व सार्व. ग्रंथालयास लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करून त्यापोटी त्यांचे होणारे देयक अदा करणेकामी वित्तीय मंजूरी देत आहे.

[signature] १/१/२०२१

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र. :-** 322 **विभाग :- वाहन**

**दिनांक :-** ०१/०१ /२०२१

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे २ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर शिवाय) खरेदी करणे.**

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे २ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर शिवाय) खरेदी करणे कामी मा. प्रशासकीय ठराव क्र. ९६ दिनांक ०९/०९/२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये दि. १२/११/२०२० रोजीच्या दै. सकाळ, दै. नवराष्ट्र, दै. जागरुक टाईम्स, दै. नवभारत, दै. मिड-डे, दै. इंडीयन एक्स्प्रेस व दै. पूर्ण विराम या वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन इच्छूक निविदाकारांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या मुदतीत एकूण ०३ ई- निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तांत्रिक बाबींचा लिफाफा क्र. १ दि. २७/११/२०२० रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पडताळणी करणेकामी मा.निविदा समिती समोर ठेवणेत आली. प्राप्त ई-निविदांमधील ०३ ई-निविदाकारांची कागदपत्र योग्य असल्याने ०३ ई-निविदा पात्र ठरवून त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडणेस मा.निविदा समितीने दि. ०७/१२/२०२० रोजी मंजूरी दिली. प्राप्त मंजूरीन्वये दि. ०८/१२/२०२० ई-निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. त्यातील दराचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ क्र | वाहनाचा तपशील | ई-निविदाकाराचे नांव दर (सर्व करांसहित) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स | | मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. | | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. | |
| | | (कराशिवाय) | (करासहित) | (कराशिवाय) | (करासहित) | (कराशिवाय) | (करासहित) |
| १ | २० टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| २ | २०.५ टन एक्सकेवेटर्स | ८०८२७२२/- | ९५३७६११.९६०/- | ८६१६१०२/- | १०१६७०००.३६०/- | ० | ० |
| ३ | २१ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | ७९६४६७२/- | १०८३११५३.९२०/- |
| ४ | २१.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | ८०८५७४२/- | १०९९६६०९.१२०/- |
| ५ | २२ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | ८२४४६३२/- | ११२१२६९९.५२०/- |
| ६ | २२.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ७ | २३ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ८ | २३.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |

वसई - विरार शहर महानगरपालिका
महानगरपालिका सचिव

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | २४ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| १० | २४.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ११ | २५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |

ई-निविदाधारकांने सादर केलेले दराचे परिक्षण केले असता महानगरपालिकेने मागविण्यात आलेल्या २० ते २५ टन क्षमतेच्या एक्सकेवेटर्स मध्ये महापालिकेस लागणाऱ्या एक्सकेवेटर्स ची क्षमता ही २० ते २१ टनापर्यंत असल्यास ती महानगरपालिकेच्या कामकाजासाठी पूरक आहे असे मा.आयुक्त तथा अध्यक्ष यांचे मत आहे. तसेच २० ते २१ टन क्षमतेच्या एक्सकेवेटर्समधील वैशिष्टये व तांत्रिक बाबींचा विचार करता ती समान आहेत. व त्यात फारसा फरक दिसून येत नाही. असे यांत्रिकी अभियंता यांचे मत आहे. तसेच मा. आयुक्त महोदय यांनी निदर्शनास आणून दिले की, मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे बेसिक दरात व करासहीत च्या दरात तफावत असल्याचे दिसून येत आहे. मा. आयुक्त महोदय यांनी सुचित केलेनूसार मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि या कंपनीस विचारणा केली असता सदरच्या यंत्रसामुग्रींसाठी भरणेत आलेला कर हा दरपत्रातील प्रणालीमध्ये अनावधनाने दुप्पटीने भरणेत आला. असे दि. ११/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी कळविलेले आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार केला असता मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांची बेसिक व्हॅल्यु ही रु. ७९६४६७२/-/- असून त्यावरील १८ % जी.एस.टी कर लावला असता त्याची एकूण रक्कम रु. ९३,९८,३१३/- हा दर विचारात घेता २०.५ टन ते २१ टन एक्सकेवेटर्स यांची एकत्रितरित्या तुलना केल्यास २० ते २१ टन क्षमतेचे एक्सकेवेटर्स (ब्रेकर शिवाय) साठी मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे दर कमी दिसून येत आहेत. करिता मा. अति.आयुक्त महोदय यांचे सुचनेनुसार दि. /१२/२०२० रोजी प्राप्त कमी दराचे ई-निविदाकार मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांना वाटाघाटी करणेकामी मा. अति.आयुक्त महोदय यांचे दालनात बोलविण्यात आलेले होते. वाटाघाटीअंती मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी सादर केलेल्या दरातच काम करण्यास सहमती दर्शविली. तरी वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | वाहनाचा तपशील | ई-निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत) | |
|---|---|---|---|
| | | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे वाटाघाटीअंती कमी केलेले दर |
| १ | २१ टन एक्सकेवेटर्स | ७९६४६७२/- (कराशिवाय) | **७९६४६७२/-** (कराशिवाय) |
| | | ९३,९८,३१३/- (सर्व करासहीत) | **९३,९८,३१३/-** (सर्व करासहीत) |

महानगरपालिका सचिव

वरीलप्रमाणे मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.यांनी वाटाघाटीअंती दर सादर केलेले आहेत. मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे कमी दरास व त्यांचे समवेत संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई- विरार शहर घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे २ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर शिवाय) खरेदी करणेकामी ई-निविदा मागविण्यात आलेल्या असुन ०३ ई-निविदाधारकांनी भागही घेतलेला आहे. त्यापैकी मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या तुलनात्मकदृष्टया कमीतकमी प्राप्त झालेल्या दरास तसेच त्यांचेसमवेत संविदा करणेस मान्यता देत आहे.

1/1/2021

**आयुक्त**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. :- ३२३ — विभाग :- वाहन
दिनांक :- ०७/०७/२०२१

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या "घनकचरा व्यवस्थापन" विभागासाठी २ नग २० टन ते २५ टन क्षमतेचा एक्सकेवेटर लाँग बुम लाँग रीच (४५ फुट पेक्षा जास्त) (ब्रेकर शिवाय) खरेदी करणे.**

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या "घनकचरा व्यवस्थापन" विभागासाठी २ नग २० टन ते २५ टन क्षमतेचा एक्सकेवेटर लाँग बुम लाँग रीच (४५ फुट पेक्षा जास्त) (ब्रेकर शिवाय) खरेदी करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. ९६ दिनांक ०९/०९/२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये दि. १२/११/२०२० रोजीच्या दै. सकाळ, दै. नवराष्ट्र, दै. जागरुक टाईम्स, दै. नवभारत, दै. मिड-डे, दै. इंडीयन एक्सप्रेस व दै. पूर्ण विराम या वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन इच्छूक निविदाकारांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या मुदतीत एकूण ०३ ई- निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तांत्रिक बाबींचा लिफाफा क्र. १ दि. २७/११/२०२० रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पडताळणी करणेकामी मा.निविदा समिती समोर ठेवणेत आली. प्राप्त ई-निविदांमधील ०३ ई-निविदाकारांची कागदपत्र योग्य असल्याने ०३ ई-निविदा पात्र ठरवून त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडणेस मा.निविदा समितीने दि. ०७/१२/२०२० रोजी मंजूरी दिली. प्राप्त मंजूरीन्वये दि. ०८/१२/२०२० ई-निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. त्यातील दराचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र | वाहनाचा तपशील | ई-निविदाकाराचे नांव दर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स (कराशिवाय) | मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स (करासहित) | मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. (कराशिवाय) | मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. (करासहित) | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. (कराशिवाय) | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. (करासहित) |
| १ | २० टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| २ | २०.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ३ | २१ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | १०३६६१०२/- | १२२३२०००.३६/- | 0 | 0 |
| ४ | २१.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ५ | २२ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ६ | २२.५ टन | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एक्सकेवेटर्स | | | | | | |
| ७ | २३ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ८ | २३.५ टन एक्सकेवेटर्स | १००६७०४३/- | ११८७९११०.७०/- | N.Q | N.Q | 0 | 0 |
| ९ | २४ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |
| १० | २४.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | ९९५८१०२/- | १३५४३०१८.७८/- |
| ११ | २५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | 0 | 0 |

उपरोक्त तक्त्याचे परिक्षण केले असता अ.क्र.२) मध्ये नमुद २१ टन एक्सकेवेटर्स या यंत्रसामुग्रीसाठी मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. अ.क्र. ८) २३.५ टन एक्सकेवेटर्स या यंत्रसामुग्रीसाठी मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स व अ.क्र. १०) २४.५ टन एक्सकेवेटर्स या यंत्रसामुग्रीसाठी मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी दर भरलेले दिसून येत आहेत. परंतु महापालिकेने मागविण्यात आलेल्या २० ते २५ टन क्षमतेच्या एक्सकेवेटर्स मध्ये महापालिकेस लागणाऱ्या लॉंग बुम लॉंग रिच एक्सकेवेटर्स ची क्षमता जास्तीची असल्यास ती महानगरपालिकेच्या कामकाजासाठी पूरक आहेत. लॉंग बुम लॉंग रिच एक्सकेवेटर्स यंत्रसामुग्रीचा विचार केला असता यंत्रसामुग्रीचा रिच हा जास्तीचा असल्याने सदर मशीनचे वजन जास्त असल्यास तांत्रिकदृष्टया योग्य राहील. तसेच मा. आयुक्त महोदय यांनी निदर्शनास आणून दिले की, मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि यांचे बेसिक दरात व करासहीत च्या दरात तफावत असल्याचे दिसून येत आहे. मा. आयुक्त महोदय यांनी सुचित केलेनूसार मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि या कंपनीस विचारणा केली असता सदरच्या यंत्रसामुग्रींसाठी भरणेत आलेला कर हा दरपत्रातील प्रणालीमध्ये अनावधनाने दुप्पटीने भरणेत आला. असे दि. ११/१२/२०२० रोजीच्या पत्रान्वये मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी कळविलेले आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार केला असता मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांची बेसिक व्हॅल्यु ही रु. ९९,५८,१०२/- असून त्यावरील १८ % जी.एस.टी कर लावला असता त्याची एकूण रक्कम रु. १,१७,५०,५६०/- हा दर विचारात घेता २० टन ते २५ टन एक्सकेवेटर्स यांची एकत्रितरित्या तुलना केल्यास २४.५ टन क्षमतेची मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे दर कमी दिसून येत आहेत. करिता मा. अति.आयुक्त महोदय यांचे सुचनेनुसार दि. /१२/२०२० रोजी प्राप्त कमी दराचे ई-निविदाकार मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांना वाटाघाटी करणेकामी मा. अति.आयुक्त महोदय यांचे दालनात बोलविण्यात आलेले होते. वाटाघाटीअंती मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी सादर केलेल्या दरातच काम करण्यास सहमती दर्शविली. तरी वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | वाहनाचा तपशील | ई-निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत) | |
|---|---|---|---|
| | | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे वाटाघाटीअंती कमी केलेले दर |
| १ | **२४.५ टन एक्सकेवेटर्स** | ९९५८१०२/- (कराशिवाय) | **९९५८१०२/- (कराशिवाय)** |
| | | १,१७,५०,५६०/- (सर्व करासहीत) | **१,१७,५०,५६०/- (सर्व करासहीत)** |

वरीलप्रमाणे मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.यांनी वाटाघाटीअंती दर सादर केलेले आहेत. मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे कमी दरास व त्यांचे समवेत संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या "घनकचरा व्यवस्थापन" विभागासाठी २ नग २० टन ते २५ टन क्षमतेचा एक्सकेवेटर लाँग बुम लाँग रीच (४५ फुट पेक्षा जास्त) (ब्रेकर शिवाय) खरेदी करणेकामी ई-निविदा मागविण्यात आलेल्या असुन ०३ ई-निविदाधारकांनी भागही घेतलेला आहे. त्यापैकी मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या तुलनात्मकदृष्टया कमीतकमी प्राप्त झालेल्या दरास तसेच त्यांचेसमवेत संविदा करणेस मान्यता देत आहे.

1/1/2024

**आयुक्त**

**वसई विरार शहर महानगरपालिका**

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. :- 328 | विभाग :- वाहन
दिनांक :-०७/०७/२०२१

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर सहीत) खरेदी करणे.**

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर सहीत) खरेदी करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. ९६ दिनांक ०९/०९/२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये दि. १२/११/२०२० रोजीच्या दै. सकाळ, दै. नवराष्ट्र, दै. जागरुक टाईम्स, दै. नवभारत, दै. मिड-डे, दै. इंडीयन एक्सप्रेस व दै. पूर्ण विराम या वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन इच्छूक निविदाकारांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या मुदतीत एकूण ०३ ई- निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तांत्रिक बाबींचा लिफाफा क्र. १ दि. २७/११२०२० रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पडताळणी करणेकामी मा.निविदा समिती समोर ठेवणेत आली. प्राप्त ई-निविदांमधील ०३ ई-निविदाकारांची कागदपत्र योग्य असल्याने ०३ ई-निविदा पात्र ठरवून त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडणेस मा.निविदा समितीने दि. ०७/१२/२०२० रोजी मंजूरी दिली. प्राप्त मंजूरीन्वये दि. ०८/१२/२०२० ई-निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. त्यातील दराचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र | वाहनाचा तपशील | ई-निविदाकाराचे नांव दर | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स (कराशिवाय) | मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स (करासहित) | मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. (कराशिवाय) | मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि. (करासहित) | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. (कराशिवाय) | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. (करासहित) |
| १ | २० टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q |
| २ | २०.५ टन एक्सकेवेटर्स | ५२४८३२५/- | ६१९३०२३.५०/- | ५३५३०५०/- | ६३१६५९९/- | N.Q | N.Q |
| ३ | २१ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | ४९५७३३६/- | ५८४९६५६.४८/- |
| ४ | २१.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | ५०१७८७१/- | ५९२१०८७.७८/- |
| ५ | २२ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | ५०९७३१६/- | ६०१४८३२.८८/- |
| ६ | २२.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | २३ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q |
| ८ | २३.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q |
| ९ | २४ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q |
| १० | २४.५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q |
| ११ | २५ टन एक्सकेवेटर्स | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q | N.Q |

उपरोक्त तक्त्याचे परिक्षण केले असता अ.क्र.२) मध्ये नमुद २०.५ टन एक्सकेवेटर्स या यंत्रसामुग्रीसाठी **मे. बॉम्बे जेसीबी अर्थमुव्हर्स व मे. टोटल अर्थमुव्हर्स प्रा.लि.** अ.क्र. ३) २१ टन एक्सकेवेटर्स अ.क्र. ४) २१.५ टन एक्सकेवेटर्स व अ.क्र. ५) २२ टन एक्सकेवेटर्स या यंत्रसामुग्रीसाठी **मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.** यांनी दर भरलेले दिसून येत आहेत. भाग घेतलेल्या ई-निविदाधारकांने सादर केलेले दराचे परिक्षण केले असता महानगरपालिकेने मागविण्यात आलेल्या २० ते २५ टन क्षमतेच्या एक्सकेवेटर्स मध्ये महापालिकेस लागणाऱ्या एक्सकेवेटर्स ची क्षमता ही २० ते २१ टनापर्यंत असल्यास ती महानगरपालिकेच्या कामकाजासाठी पूरक आहे. असे मा.आयुक्त तथा अध्यक्ष यांचे मत आहे. तसेच २० ते २१ टन क्षमतेच्या एक्सकेवेटर्समधील वैशिष्टये व तांत्रिक बाबींचा विचार करता ती समान आहेत. व त्यात फारसा फरक दिसून येत नाही. असे यांत्रिकी अभियंता यांचे मत आहे. करिता मा. अति.आयुक्त महोदय यांचे सुचनेनुसार दि. /१२/२०२० रोजी प्राप्त कमी दराचे ई-निविदाकार मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांना वाटाघाटी करणेकामी मा. अति.आयुक्त महोदय यांचे दालनात बोलविण्यात आलेले होते. वाटाघाटीअंती मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांनी सादर केलेल्या दरातच काम करण्यास सहमती दर्शविली. तरी वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे :-

| अ.क्र | वाहनाचा तपशील | ई-निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत) | |
|---|---|---|---|
| | | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. | मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे वाटाघाटीअंती कमी केलेले दर |
| १ | २१ टन एक्सकेवेटर्स | ४९५७३३६/- (कराशिवाय) | ४९५७३३६/- (कराशिवाय) |
| | | ५८४९६५६.४८/- (सर्व करासहीत) | ५८४९६५६.४८/- (सर्व करासहीत) |

वरीलप्रमाणे मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.यांनी वाटाघाटीअंती दर सादर केलेले आहेत. मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि. यांचे कमी दरास व त्यांचे समवेत संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई- विरार शहर घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी २० ते २५ टन क्षमतेचे १ नग एक्सकेवेटर्स (ब्रेकर सहीत) खरेदी करणेकामी ई-निविदा मागविण्यात आलेल्या असुन ०३ ई-निविदाधारकांनी भागही घेतलेला आहे. त्यापैकी मे. ह्युंडाई कंन्स्ट्रक्शन्स इक्युपमेंटस प्रा.लि.यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या तुलनात्मकदृष्टया कमीतकमी प्राप्त झालेल्या दरास तसेच त्यांचेसमवेत संविदा करणेस मान्यता देत आहे.

11/1/2021

**आयुक्त**

**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३२५

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ०१/०९/~~2020~~ २०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वित्तिय वर्षांकरिता आवश्यकते प्रमाणे"ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे" या कामीची ई-निविदा मागविणेकामी आवश्यक प्रक्रिया करुन संविदा करणेस व सदर कामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मंजूरी मिळणेच्या मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचे २ रुग्णालये, २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ९ दवाखाने, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ कोवीड रुग्णालये यांचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. रुग्णालयीन विभागाच्या दैनंदिन कामकाजासाठी ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे आवश्यक असते. सदरची बाब अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने त्वरीत ई-निविदा प्रक्रिया करणे गरजेचे आहे. जेणेकरुन रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये गैरसोय होणे टाळता येईल. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | सन २०२१-२२ (अपेक्षित खर्चाची रक्कम) | सन २०२२-२०२३ (अपेक्षित खर्चाची रक्कम) | सन २०२३-२०२४ (अपेक्षित खर्चाची रक्कम) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वसई विरार शहर महानगरपालिकेची विविध रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे व कोवीड रुग्णालये येथिल ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे | ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींग सह अन्य रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती- अपेक्षीत खर्चाची रक्कम रु. २,००,००,०००/- | ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींग सह अन्य रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती- अपेक्षीत खर्चाची रक्कम रु.२,५०,००,०००/- | ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींग सह अन्य रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती- अपेक्षीत खर्चाची रक्कम रु.३,००,००,०००/- |

ठरावः- उपरोक्त तक्यानुसार सदर प्रस्तावामध्ये सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या त्रेवार्षिकाकरीता वित्तिय वर्षनिहाय व लेखाशिर्षाअंतर्गत केलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने रुग्णालयातील ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणेकामी ई-निविदा मागविणेकामी आवश्यक प्रक्रिया करुन संविदा करणेस व सदर कामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी )
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** ३२६ | विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०४/०१/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई - विरार शहर महानगरपालिका सुर्या योजना टप्पा १ अंतर्गत धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील फिल्टर बेड व क्लॅरिफ्लॉक्युलेटर चे Sluice Gate तसेच Sluice Valve बदलणे.

---

**प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ४८,४०,२२६ /-**

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेस सुर्या योजना टप्पा १ अंतर्गत १०० द.ल.ली पाणी पुरवठा होत आहे. सदरची योजना सन २००४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आली असुन १०० द.ल.ली क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र धुकटण येथे आहे. जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरिफ्लॉक्युलेटर व फिल्टर वर बसविण्यात आलेल्या वेगवेगळया झडपा (Sluice Valve / Gate ) ह्याची जलशुध्दीकरण कार्यचलना दरम्यान वारंवार उघडझाप करावी लागते. सदर जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरिफ्लॉक्युलेटर मधील साठलेला गाळ बाहेर काढण्याकरीता पाईपलाईनवर बसविण्यात आलेले ३०० mm व्यासाच्या झडपा (Sluice Valve) ह्या नादुरुस्त झालेल्या असुन त्यामधुन गळती सुरु आहे. दोनही क्लॅरिफ्लॉक्युलेटर चे Drain चे ३००mm व्यासाच्या झडपा बदलणे आवश्यक आहे. तसेच ठराविक अंतराने प्रत्येक फिल्टर बेड हा Back Wash घेऊन (जमा झालेला गाळ काढणे) साफ करावा लागतो. सदर Back Wash चे गाळ मिश्रीत पाणी बाहेर काढण्याकरीता फिल्टर बेड वर M.S चे Sluice Gate (झडप) बसविण्यात आलेले असुन ते गंजुन खराब झालेले आहेत. तसेच वारंवार उघडझाप करता असल्याकारणाने नादुरुस्त ही झाले आहेत. त्यामुळे त्यामधुन मोठया प्रमाणात गळती होत आहे. सदरच्या आठही फिल्टर बेडचे M.S. गेट्स बदलण्यात येऊन नव्याने S.S. गेट्स बसविणे अंत्यत आवश्यक आहे.

बॅकवॉश करण्याकरीता लागणारे आवश्यक पाणी टाकीत चढविण्याकरीता बसविण्यात आलेल्या ३ पंपावर २५० mm व्यासाचे SluiceValve व Non Return Valve हे पुर्णपणे खराब झाले असुन नव्याने बसविणे आवश्यक आहे. वरील सदर कामी Sluice Gate चे बाजारभाव व Valve चे दर हे म.जी.प्रा. २०१९-२० च्या दरसुचीतील दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन रक्कम

रु.४८,४०,२२६ /- अपेक्षित आहे. सदरचा खर्च "**वि. नि. अ. सुर्या योजना भांडवली कामे** " या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिका सुर्या योजना टप्पा १ अंतर्गत धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील फिल्टर बेड व क्लॅरिफ्लॉक्युलेटर चे Sluice Gate तसेच Sluice Valve बदलणे कामी बी/१ प्रकारची ई – निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. ४८,४०,२२६ /- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक साहेब यांच्या मंजुरीस्तव सादर.

---

**ठराव :-** . वसई - विरार शहर महानगरपालिका सुर्या योजना टप्पा १ अंतर्गत धुकटण जलशुध्दीकरण केंद्रामधील फिल्टर बेड व क्लॅरिफ्लॉक्युलेटर चे Sluice Gate तसेच Sluice Valve बदलणे कामी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. ४८,४०,२२६ /- इतक्या खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक साहेब यांची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी असे.

6/1/2021

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५**

दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ३२८ विभाग : बांधकाम

दिनांक : ०४/०३/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील फिलीप कॉम्प्लेक्सच्या पाठीमागील २० मी. डी.पी. रस्त्यावर आर.सी.सी कल्व्हर्ट बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकिय रक्कम :- रु. ३५,९९,६२७/-

३) प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील फिलीप कॉम्प्लेक्स ते तांदुळबाजाराकडे मनपाच्या विकास आराखडयानुसार वॉटर चॅनलचे आरक्षण आहे. सन २०२०च्या पावसाळ्यापुर्वी सदरचे चॅनल महापालिकेकडुन खोदुन घेण्यात आलेले आहे. तत्पुर्वी चुळणे परिसर व सनसिटी परिसर या भागात दोन वर्षापुर्वी पावसात पुर परिस्थिती निर्माण झाली होती. या अनुषंगाने मनपाकडुन त्रयस्थ मान्यताप्राप्त संस्थंकडुन म्हणजेच नेरी व आय.आय.टी विभागाकडुन पावसाळयात झालेल्या पुर परिस्थिती बाबत अहवाल मागविणेत आलेला होता. सदरच्या अहवालात नेरी व आय.आय.टी संस्थने सुचविलेल्या पर्यायानुसार फिलीप कॉम्प्लेक्स च्या पाठीमागील २० मी. डी.पी. रस्त्यावर आरसीसी कल्व्हर्ट बांधणे क्रम प्राप्त आहे. सदर संस्थने सुचविलेल्या पर्यायीपैकी चॅनलवरील तांदुळबाजार येथील बंगली मुख्य रस्त्यावर आरसीसी उघाडीचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. तसेच वसई - बाभोळा मुख्य रस्त्यावरील बीग बाजार येथील आरसीसी उघाडी कामाचे संबंधीत ठेकेदारास कार्यादेश देऊन पुर्ण करणेत येणार आहे.

तथापी दि. २७/११/२०२० रोजी मा. आयुक्त सो., मा. कार्यकारी तथा शहर अभियंता, उपसंचालक, नगर रचना विभाग यांची फिलीप कॉम्प्लेक्स ते तांदुळबाजार ते पुढे चुळणे सोंड नाल्याचे स्थळ पाहणी करतेवेळी फिलीप कॉम्प्लेक्सच्या पाठी मागील २० मी. डी.पी. रस्त्यावर आर.सी.सी कल्व्हर्ट बांधणेची कार्यवाही करणेसंबंधी सुचना निर्देशित केलेल्या आहेत. तरी याबाबत अंदाजपत्रक तयार केलेले असुन याबाबत रक्कम रु. ३५,९९,६२७/- इतका खर्च अपेक्षित आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे :- सोलींग, पीसीसी, आर.सी.सी. राफ्ट, आर.सी.सी परदी, आर.सी.सी स्लॅब

परिमाण :- २० मी. x ७.५० मी.

५) यापूर्वा सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :-

७) विकास आराखडयातील आरक्षण :- २० मी. डी.पी. रस्ता
८) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र.९३ अ.क्र.२५९८ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील फिलीप कॉम्प्लेक्सच्या पाठीमागील २० मी. डी.पी. रस्त्यावर आर.सी.सी कल्व्हर्ट बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३५,९९,६२७/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

९/१/२०२०.
०८ आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३२८ — विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ०४/०१/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महनगरपालिकेच्या सन २०२०-२०२१ या वित्तिय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये शववाहिनी, रुग्णवाहिका इत्यादीसाठी डिझेल व वंगण खरेदी, रुग्णालय इतर साहित्य खरेदी, रुग्णालय औषधे खरेदी व ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये प्रा.आरोग्य केंद्र देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षातील प्रस्तावित वाढीची रक्कम वाढवुन मिळणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च,२०२० पासून लागू करुन यामधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली असून शासन अधिसूचनेच्या नियम १० नुसार कार्यक्षेत्रात कोव्हीड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना व उपचारासाठी कार्यक्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी अलगीकरण व विलगीकरण कक्ष तयार करणेत आले. हे सर्व कामकाज व वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत येणारी रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, दवाखाने व वैद्यकीय आरोग्य विभागातील कामकाज ही सेवा आवश्यक असल्याने संपूर्ण कामकाज कालमर्यादेत करणे आवश्यक होते. त्यामुळे महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता महानगरपालिकेचे रुग्णालये,माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे,कोव्हीड-१९ रुग्णालये व वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये कार्यालयीन कामकाजासाठी रुग्णवाहिका/शववाहिनी,जनरेटर डिझेल,इतर साहित्य खरेदी, औषधे खरेदी,ऑक्सिजन सिलेंडर व इतर आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन घेण्यात आले. यासाठी सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात "शववाहिनी,रुग्णवाहिका इत्यादीसाठी डिझेल व वंगण खरेदी " या लेखाशिर्षाखाली माहे नोव्हेंबर २०२० पर्यंत रु. १८,११,७११/-, रुग्णालय इतर साहित्य खरेदी या लेखाशिर्षाखाली माहे नोव्हेंबर २०२० पर्यंत रु. ३,९९,९४,०६०/-, रुग्णालय औषधे खरेदी या लेखाशिर्षाखाली माहे नोव्हेंबर २०२० पर्यंत रु. ७,८७,०३,८९४/- व ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती रु.४,३९,७९,१५७/- इतका खर्च झाला आहे व या वित्तीय वर्षात मार्च अखेर पर्यंत या सर्व लेखाशिर्षाअंतर्गत याकामी पुढील चार महिन्याकरिता संभाव्य खर्च प्रत्येकी रु. ५०,००,०००/- इतका अपेक्षीत आहे. परंतु सदर लेखाशिर्षाखाली सन २०२०-२०२१ मध्ये अनुक्रमे रु. २०,००,०००/- ,रु.४,००,००,०००/-,रु.८,००,००,०००/- व रु.५,००,००,०००/- इतकी

तरतुद केलेली होती त्याकरीता सदरचा खर्च भागविण्याकरीता उर्वरीत रक्कम सन २०२०-२०२१ या वर्षातील "प्रा.आरोग्य केंद्र देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली रु. ५,००,००,०००/- इतकी तरतुद केलेली असुन यामधुन माहे नोव्हेंबर पर्यंत रु.४९,५६०/- इतका खर्च झालेला आहे, व या वित्तिय वर्षात मार्च अखेर याकामी पुढील चार महिन्याकरिता संभाव्य खर्च रु.१,००,००,०००/- इतका अपेक्षीत आहे. तरी यानुसार "प्रा.आरोग्य केंद्र देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षामधील प्रत्येकी रक्कम रु.५०,००,०००/- "शववाहिनी, रुग्णवाहिका इत्यादीसाठी डिझेल व वंगण खरेदी "रुग्णालय इतर साहित्य खरेदी, रुग्णालय औषधे खरेदी व ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षात वर्ग केल्यास वैद्यकीय आरोग्य विभागात पुरविण्यात येणाऱ्या रुग्णवाहिका डिझेल खर्च,इतर साहित्य खरेदी,औषधे खरेदी, व ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती या लेखार्शिषाखाली भागविणे आवश्यक असल्याने सदरचा विषय प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त रुग्णवाहिका डिझेल चे देयक,इतर साहित्य खरेदी देयक, रुग्णालय औषधे खरेदी व ऑक्सिजन सिलेंडर रिफिलींगसह रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती या सर्वांचे देयक अदा करणेकामी "प्रा.आरोग्य केंद्र देखभाल दुरुस्ती"या लेखार्शिषाखालील शिल्लक तरतुदी मधून उपरोक्त लेखाशिर्षाअंतर्गत प्रत्येकी रु.५०,००,०००/-(अक्षरी पन्नास लक्ष रुपये मात्र) वर्ग करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.) 5/1/2021

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ३२८ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०४/०९/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिका सुर्या योजनेअंतर्गत धुकटन व उसगाव योजनेअंतर्गत पारोळ जलशुध्दीकरणकेंद्र येथे Alum व PAC टँकच्या लिकेजची दुरुस्ती करुन Acid Proof Tiles बसविणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :-

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम | :- रु. ३६,७३,८२३/- |
| प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका) | :- मा. स्थायी समिती सभा वि/ठराव क्र. १२ दि. २७/१२/२०१९ |
| तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम | :- रु. ३६,७३,८२३/- |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिध्दी वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा | :- जा.क्र. वविशम/पापु/८०२/२०१९ दि. ३१/१२/२०१९ |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिध्दी वृत्तपत्रातील व्दितीय वेळ जाहिर निविदा | :- दै. आमची मुंबई , दै. मिड डे, दै. मुंबई चौफेर |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिध्दी | :- दि.०२/०१/२०२०जा.क्र.वविशम/पापु/ ८२७/ २०२० |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा | :- दि. १४/०१/२०२०दै. आमची मुंबई दै. मिड डे, दै. मुंबई चौफेर, दि. १६/०१/२०२ |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा | :- दि. ०३/०२/२०२० ०३ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकार | :- मा. शहर अभियंत |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक ( व्दितीय लखोटा) | :- दि. ११/०२/२०२० |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार | :- ०३ |

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | निविदा धारकाचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| १ | मे. एस डी बुटाला | ५.५०% जादा दराने (वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराने) |
| २ | मे. मयुरेश मोतीराम जाधव | १०.५०% जादा दराने |
| ३ | मे. राजेश कंन्स्ट्रक्शन | ८.९९% जादा दराने |

उपरोक्त निविदांचे अवलोकन केले करता मे. एस डी बुटाला यांच्या निविदेतील ५.५०% जादा दर हा इतर निविदा दरापेक्षा कमी आहे. सदर दर महापालिकेस जास्त वाटत असल्याने मा. शहर अभियंता यांनी जा. क्र. वविशम / पापु / शअ /पापु/१०४३ /२०२० दि. १७/०२/२०२० अन्वये मे. एस डी बुटाला यांना वाटाघाटीने दर कमी करण्याच्या चर्चेसाठी निमंत्रित केले असता मे. एस डी बुटाला यांनी दि. १८/०२/२०२० च्या पत्राने वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दराने काम करणे शक्य असल्याचे कळविले आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी सदर कामा करीता अंदाजपत्रकीय दरास मान्यता दिलेली आहे. करीता सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. एस डी बुटाला यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक, यांच्या पुढे ठेवण्यास शिफारस असे.

---

**ठराव** :- उपरोक्त कामी **मे. एस. डी. बुटाला** यांच्या **अंदाजपत्रकीय दराच्या** निविदेस मान्यता दिली असून महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcoporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.:- ३३०

विभाग : जाहिरात विभाग
दिनांक :०६/ ०१ /२०२१

**प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका जाहिरात विभगाचे नवीन दरास प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

संदर्भ :- १) सर्वसाधारण सभा ठराव क्र.२३ दि.१९/१२/२०१३ अन्वये प्रस्तावास मंजुरी.
२) स्थायी समिती ठराव क्र.४८४ दि.१२/१/२०१८ अन्वये निविदेस मंजुरी.
३) मे. विजास डिजिटल इं. प्रा.लि. मुंबई यांस वविशम/साप्रवि/३३/२०१८-१९ नुसार दि.१७/०४/२०१८ कामाचा कार्यादेश.
४) वविशम यांचे दि.२४/०९/२०२०, १९/१०/२०२०, १८/११/२०२० रोजीची वसुली नोटीस.
५) वविशम जाहिरात विभाग यांचा निविदा रद्द करणेबाबत प्रशासकीय ठराव क्र.२२८ दि.१८/११/२०२०.
६) वविशम जाहिरात विभाग यांचा निविदा दर निश्चित करणेबाबत प्रशासकीय ठराव क्र.२६० दि. ०९/ १२/२०२०.
७) वसई तालुका ॲडव्हरटायझर्य वेल्फेअर असोसियएशन यांचे दि.०२/०१/२०२१ रोजीचे निवेदन.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण ) नियम २००३ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आकाशचिन्ह व दृश्य भागातील जाहिराती यांचे नियंत्रण करणे, तसेच त्यांना कर/ फी लावणे यांचे अधिकार प्राप्त आहेत. वरील संदर्भ क्र.१ अन्वये महापालिकेच्या जाहिरात धोरणास व त्याच्या अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ अन्वये मा. स्थायी समितीने जाहिरात निविदेस मान्यता दिलेली असून संदर्भ क्र.३ अन्वये निविदाधारकास कार्यादेश देण्यात आलेला असून सदर निविदा /करारनामा अनुषंगाने त्यांनी रु.१,४४,०८,०००/- जाहिरात शुल्काचा सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे भरणा केलेला नाही.

त्यानुषंगाने दर निविदाधारकांस संदर्भ क्र.४ अन्वये जाहिरात शुल्क भरणेकरिता नोटीस बजविण्यात आले असुन त्यांनी निविदेची रक्कम भरणा केली नाही, तसेच समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही त्यामुळे संदर्भ क्र.५ अन्वये प्रशासकीय ठराव मंजुर करुन निविदाधारकाची निविदा रद्द करणेची कार्यवाही करणेत आली. जाहिरात दर निश्चित न झाल्यामुळे व निविदाधारकाकडून असलेले जाहिरात शुल्क भरणा होत नसल्याने जाहिरात विभागाकडून मिळणा-या उत्पन्नास मुकावे लागत असून महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. महापालिकेच्या क्षेत्रातील जाहिरातीचे विविध स्त्रोत उपलब्ध करणेकरिता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने इतर महानगरपालिकेच्या दराचा तुलनात्मकरित्या अवलोकन करुन संदर्भ क्र.६ ठराव क्र.२६० दि.०९/१२/२०२० अन्वये जाहिरातीचे नविन दर मंजुरी घेण्यात आली.

संदर्भ क्र.७ अन्वये वसई विरार होर्डिग्ज ॲडव्हरटायझर्य वेल्फेअर असोसिएशन तर्फे कोरोनाच्या महामारीच्या विचार करता वसई विरार शहर महानगरपलिकेने मंजुर केलेल्या पुर्वीच्या दरपत्रकामधील दराच्या रक्कमेमध्ये ५०% प्रति चौ.फुट प्रतिमहिना या दराने आकारणी करावी असे विनंती केलेली आहे. तसेच इतर महापालिकेच्या जाहिरात दराची तुलनात्मकरीत्या अभ्यास करुन महानगरपलिकेने खालीलप्रमाणे सुधारित जाहिरातीचे दर प्रस्तावित केले आहेत.

## जाहीरात व आकाशचिन्हांबाबत जाहीरात दर तक्ता

| अ.क्र | जाहिरातीचा प्रकार | मोजमाप | वसई विरार शहर महानगरपालिका नवीन सुधारित दर (रुपये. प्रति चौ. फुट प्रति महिना) | |
|---|---|---|---|---|
| | | | अप्रकाशित | प्रकाशित |
| १ | मनपा जागेतील होर्डिंग्ज ( जाहिरात फलक) | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| २ | खाजगी जागेतील होर्डिंग्ज (जाहिरात फलक) | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| ३ | फ्लेक्स तात्पुरते/कापडी बॅनर्स ( जास्तीत जास्त ०५ दिवसांसाठी) | ५० चौ.फुटपर्यंत | १०० (प्रतिदिन) | २०० (प्रतिदिन) |
| | | ५० चौ.फुटपेक्षा जास्त | २०० (प्रतिदिन) | ४०० (प्रतिदिन) |
| ४ | दिव्यांचे खांबावरील फलक (किऑक्स) | प्रति चौ. फुट | ४० | ५० |
| ५ | दुकानावरील जाहिरातीचे फलक | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| ६ | वाहनांवरील जाहिरात बॅनर व इलेक्ट्रीक होर्डिंग्ज LED | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| ७ | रोड शो/बलून | - | १००० (प्रतिदिन) | १५०० (प्रतिदिन) |
| ८ | कॅन्टीलीव्हर | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| ९ | कमानी | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| १० | प्रदुषण व वातावरण दर्शक फलक व जाहिरात फलक | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| ११ | भिंतीवरील जाहिरात | प्रति चौ. फुट | २५ | ३० |
| १२ | युनिपोल | प्रति चौ. फुट | २० | २५ |
| १३ | ॲडपोल | प्रति चौ. फुट | २० | २५ |

१) वरील नमुद केलेल्या दरामध्ये प्रतिवर्ष १०% वाढ करण्यात येईल.

२) दुकानामध्ये मुख्य/मोठे एका फलकाव्यतिरिक्त स्वत:ची व इतर कोणत्याही उत्पादकाची दुकानाचे फलकावर उत्पादकाची जाहिरात केलेली असल्यास त्यावर नमूद जाहिरात दराप्रमाणे आकारणी करण्यात येईल.

वरील तक्त्यामध्ये नमुद दर हे ०३ वर्षाकरिता तयार करण्यात आलेले असून त्यामध्ये प्रतिवर्ष १०% वाढ करण्यात येईल. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८६ (२) व ७९ अन्वये मान्यतेस्तव सादर.

**प्रस्तावाचा ठराव :- जाहिरात विभागाने उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार सुधारित जाहिरातींचे दर मंजुर करण्यात येत आहे.**

आयुक्त तथा प्रशासक 6/1/24

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५**

दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. ३३९

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- ०६/०१/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती व इतर कार्यालय/विभागांना कार्यालयीन कामकाजाकरीता अतिरिक्त संगणक संच, यु.पी.एस, प्रिंटर मंजूर निविदाकारांकडून खरेदी करणे कामी सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती, ३ रुग्णालय, २१ नागरी सुविधा केंद्रे व ६ अग्निशमन कार्यालये, नव्याने स्थापन करण्यात आलेले कोव्हिड सेंटर्स व इतर कार्यालय कार्यरत आहेत. सदर कार्यालयाअंतर्गत जन्म मृत्यू नोंदणी, विवाह नोंदणी, आवक-जावक, बजेट कंट्रोल व फाईल ट्रॅकींग, टॅली – अकाऊटींग इत्यादी कामकाज केले जातात. तसेच केंद्र शासनाच्या पी. एम. स्वनिधी, माझे कुटूंब माझी जबाबदारी इत्यादी योजना नव्याने स्थापन करण्यात आलेले जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार, ऑनलाईन आर.टी. आय, नविन स्वच्छ भारत कक्ष, आरोग्य आस्थापना विभाग याकरीता संगणक, प्रिंटर व इतर संगणकीय साहीत्यांची आवश्यकता आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका मुख्सलयासह ९ प्रभाग समिती व इतर कार्यालयांना संगणक संच, यु.पि.एस, प्रिंटर व इतर संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी प्रशासकीय ठराव क्र. १५९ दि.१२/१०/२०२० अन्वये रक्कम रु. ७१४९०७८/- इतकी मंजूरी घेण्यात आली आहे. त्याअनुषंगाने ई-निविदा प्रसिद्ध करुन लघुत्तम निविदाकार में. इनमॅक कम्प्युटर्स प्रा. लि. व में. रामदेव एन्टरप्रायजेस यांना कार्यादेश देऊन रक्कम रु. ५१,५९,३२०/- इतक्या साहित्याची खरेदी करण्यात आली आहे. तसेच सदर ई-निविदेतील दर मंजूर न झालेले साहित्य खरेदी करणेकामी फेर ई-निविदा करण्यात आली असून सदरकामी रक्कम रु. ८,८७,९७८/- इतका खर्च अपेक्षित आहे.

परंतू प्रभाग व विभाग निहाय संगणकांची व प्रिंटरची सद्यस्थितीत नवीन आलेल्या मागणी पाहता व भविष्यातील मागणीचा विचार करता अतिरिक्त ५० संगणक, ६० यु.पी.एस व ४० प्रिंटर खरेदी करणे आवश्यक आहे. तरी मंजुर निविदाकार में. रामदेव एन्टरप्रायजेस व में. इनमॅक कम्प्युटर्स प्रा लि. यांच्याकडून मंजूर दरानुसार ५० संगणक, ६० यु.पी.एस व ४० प्रिंटर खरेदी करणे कामी एकूण रक्कम रु. २६,३४,४८०/- इतका खर्च अपेक्षित असुन प्रशासकीय ठराव क्र. १५९ दि.१२/१०/२०२० अन्वये घेण्यात आलेल्या मंजूर रक्कमे पैकी उर्वरीत रक्कम रु. ११,३०,७८०/- इतकी तरतूद शिल्लक आहे. तरी सदरकामी होणाऱ्या रक्कम रु. १६,००,०००/-इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकेतांक ०४१-४१७२-१ 'माहिती व तंत्रज्ञान विभाग संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल.

तरी मंजूर निविदाकार में. रामदेव एन्टरप्रायजेस मार्फत ४० प्रिंटर व में. इनमॅक कम्प्युटर्स प्रा. लि. मार्फत मंजूर दरानुसार ५० संगणक व ६० यु.पि.एस खरेदी करणे कामी व होणाऱ्या रक्कम रु. १६,००,०००/-इतका वाढीव खर्चास सुधारीत प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती व इतर कार्यालय/विभागांना कार्यालयीन कामकजाकरीता अतिरिक्त ५० संगणक, ६० यु.पी.एस व ४० प्रिंटर मंजुर निविदाकार में. रामदेव एन्टरप्रायजेस व में. इनमॅक कम्प्युटर्स प्रा लि. यांच्याकडून मंजूर दरानुसार खरेदी करणे कामी व होणा-या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.) 6/1/2021

प्रशासक तथा आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ३३२ | विभाग :- घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :-०६/०१/२०२१

**विषय :-** **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील स्वच्छता निरिक्षक (ठेका) यांना वाहन भत्ता देणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्रभाग समिती निहाय दैनंदिन रस्ते सफाई , कचरा संकलन तसेच गटार सफाई, औषध फवारणीची कामे करण्यात येतात. सदरील कामासाठी महानगरपालिकेने प्रभाग समिती ए ते आय मध्ये २० झोन तयार करुन अभिकर्त्यांची नेमणूक केली आहे. सदरील कामासाठी एकुण ३८१२ इतके कंत्राटी सफाई कर्मचारी आहेत. तसेच दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवणेकामी महानगरपालिकेचे ७ वरिष्ठ आरोग्य निरिक्षक व २ प्र.स्वच्छता निरीक्षक असुन सदरील स्वच्छता निरिक्षकांना मदतनीस म्हणून ४० ठेका स्वच्छता निरिक्षकांची महानगरपालिकेकडुन ठेका पध्दतीने नियुक्ती करण्यांत आलेली आहे. सदरील ठेका स्वच्छता निरिक्षकांना महानगरपालिकेच्या ११५ वॉर्ड मध्ये दैनंदिन स्वच्छतेच्या कामावर नियंत्रण ठेवणेकामी नेमणूक करण्यांत आली आहे.

त्यामध्ये प्रत्येक ठेका स्वच्छता निरीक्षकांना भौगोलिक परिस्थीतनुसार सरासरी २ ते ५ वॉर्डची दैनंदिन कामकाजासाठी संपूर्ण जबाबदारी असल्याने दररोज सरासरी एक स्वच्छता निरीक्षक २५ ते ३० कि.मी.प्रवास करतो. तसेच आपात्कालीन परिस्थिती, मुख्यालयी बैठका, विशेष स्वच्छता मोहीमा यासाठी सरासरी पेक्षा जास्त अंतर फिरावे लागते व मा.नगरसेवक व प्रभागातील महत्वाच्या व्यक्तींच्या तक्रारीचे निरसण करणे, स्वच्छता भारत अभियानांतर्गत वेगवेगळया उपाययोजना राबविणे व त्याची माहिती तयार करणे इत्यादी सर्व कामे संबंधित स्वच्छता निरीक्षकाकडून करवून घेतली जातात. तसेच आपात्कालिन, अत्यावश्यक वेळी एखादी गंभीर समस्या निर्माण झाल्यास स्वत:च्या दुचाकीने अथवा ऑटो किंवा तत्सम वाहनाने रात्री-अपरात्री त्यांना कर्तव्यावर यावे लागते. परिणामी हे सर्व करण्यासाठी इंधनाचा प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी त्यांना स्वखर्चाने इंधन भरावे लागते अथवा प्रवास करावा लागतो.

सबब दैनंदिन कामकाज हे वेळेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने वेळेत काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने ठेका स्वच्छता निरीक्षक स्वत:चे वाहनाचा कार्यालयीन कामकाजासाठी वापर करत असल्याने वापर करत असलेल्या वाहनांवरील होणारा इंधनाच्या खर्चाचा अतिरिक्त भार ठेका स्वच्छता निरीक्षक यांचेवर पडत आहे.

त्याकरिता सदरील स्वच्छता निरीक्षकांना प्रती माहे रु.३०००/- वाहन भत्ता देणेबाबत प्रस्ताव सादर करणेचे मा.आयुक्त सो. यांनी तोंडी वरील संदर्भिय बैठकीमध्ये निर्देश दिलेले आहेत.

तरी सर्व ठेका स्वच्छता निरीक्षक यांना रक्कम रु.३०००/- (अक्षरी रक्कम रु.तीन हजार मात्र) एवढा पेट्रोल भत्ता खालील अटी- शर्तीवर देणेबाबत आपल्या मंजूरीस्तव सादर.

१) वाहन भत्ता पुरविणेसाठी उपरोक्त ठेका स्वच्छता निरीक्षकांकडे दुचाकी वाहन असणे आवश्यक आहे.

२) वाहन भत्ता पुरविण्यात येणाऱ्या ठेका स्वच्छता निरीक्षकाचे काम त्या त्या महिन्यात केल्याबाबतचे विभाग प्रमुखाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त ठेका स्वच्छता निरीक्षक यांचे प्रती रु.३०००/- प्रमाणे ४० ठेका स्वच्छता निरीक्षक यांचे प्रती महिना रु.१,२०,०००/- एवढा खर्ची पडणार असून प्रती वर्षी रु.१४,४०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष सामान्य प्रशासन अधिकारी वाहन भत्ता तरतुद रक्कम रु.२ कोटी २० लक्ष मधून भागविणे शक्य आहे.

तरी घनकचरा व्यवस्थापन विभागातील ठेका पध्दतीने काम करणाऱ्या ४० स्वच्छता निरीक्षकांना व भविष्यात स्वच्छता निरीक्षकांची वाढ झाल्यास सदर स्वच्छता निरीक्षकांना वाहन भत्ता मिळणेस सदरचा प्रस्ताव सादर.

<u>ठराव निर्णय :-</u> **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील ४० स्वच्छता निरीक्षक (ठेका) व भविष्यात ठेका स्वच्छता निरीक्षकांची वाढ झाल्यास सदर स्वच्छता निरीक्षकांना रु.३०००/- (अक्षरी रक्कम रु. तीन हजार मात्र) प्रती महिना एवढा वाहन भत्ता देणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.**

9/1/2021

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर, पिन नं ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल -vasaivirarcorporation @yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३३३ | विभाग : आस्थापना (मु.)
दिनांक : ०६/०१/२०२२

प्रस्तावाचा विषय :- कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदावर कार्यरत असलेले श्री. हर्षल पाटील यांना पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी मुदतवाढ देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ अन्वये दि. १६/०१/२०१६ रोजी कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदासाठी मुलाखती घेऊन दि.११/०२/२०१६ पासून सहा महिन्यांचे कालावधीसाठी श्री. हर्षल पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

मा. महासभा, ठराव क्र. ४, दि. १९/०८/२०१६ अन्वये त्यांची सेवा खंडीत करुन दि. २०/०८/२०१६ रोजी पुन्हा नियुक्ती करण्यात आली. तद्नंतर पुन्हा मा. महासभा, ठराव क्र. १५, दि. ६/०३/२०१७ अन्वये त्यांची सेवा खंडीत करुन त्यांची दि. १७/०२/२०१७ पासून पुर्ननियुक्ती करण्यात आली. तसेच मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. १९१,दि. ३१/०७/२०१८ अन्वये श्री. पाटील यांना पुन:श्च मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच संदर्भ ४ नुसार मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. २९९, दि. २३/१०/२०१८ रोजी पुन्हा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. व संदर्भ ५ नुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तसेच श्री. पाटील यांना रू. २५०००/- या मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली होती तद्नंतर मा. स्थायी समिती, ठराव क्र. २१३, दि. ११/०१/२०१६ अन्वये दि. १ डिसेंबर, २०१६ पासून रू. ५,०००/- ने वाढ करून रू. ३०,०००/- मानधन करण्यात आले.

तद्नंतर मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. २४८, दि. २६/०९/२०१८ अन्वये रु. २०, ०००/- ने वाढ करून त्यांचे मानधन रू. ५०,०००/- इतका प्रती महा करण्यात आलेला आहे.

दि. २५/१०/२०१९ रोजी श्री. पाटील यांची मुदतवाढ संपलेली होती. महानगरपालिकेस कामाची निकड पाहता श्री. हर्षल पाटील यांची सेवा चालू ठेवण्यात आलेली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञ ( I. T.) विभागात कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) संगणक विभागातील कामाची निकड पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३ (३) अन्वये या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत - यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या, त्या अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आयुक्तास मा. स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार आहे.

श्री. हर्षल पाटील यांची दि. २५/१०/२०१९ रोजी मुदतवाढ संपलेली होती. दि. २६/१०/२०१९ ते दि. २५/०४/२०२० पर्यंत त्यांनी काम केले असल्याने संदर्भ क्र. ७ नुसार त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनास कार्योत्तर मान्यता देवून दि. २७/०४/२०२० पासुन ते दि. २६/१०/२०२० पर्यंत सहा महिन्या करिता मुदतवाढ देण्यात आलेली होती.

दि. २६/१०/२०२० पासून श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदतवाढ संपलेली आहे. दि. १८/११/२०२० च्या अर्जान्वये श्री. पाटील यांनी पुन:श्च मुदतवाढ देणेकामी मागणी केल्यानुसार व संगणक विभागातील कामाची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरुपात दि. २७/१०/२०२० रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन दि. २८/१०/२०२० पासुन ते दि. २७/०४/२०२१ पर्यंत पुन:श्च सहा महिन्याचे कालावधीसाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

तरी कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदावर दि. २८/१०/२०२० पासुन ते दि. २७/०४/२०२१ पर्यंत सहा महिन्यांचा कालावधीसाठी ठोक वेतनावर श्री. हर्षल पाटील यांस पुन:श्च मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर विचार विनीमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

ठराव/ निर्णय :- संगणक विभागातील ठोक वेतनावरील श्री. हर्षल रघूनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदत दि. २६/१०/२०२० रोजी संपली आहे. श्री. हर्षल पाटील यांना संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. २८/१०/२०२० पासून दि. २७/०४/२०२१ पर्यंत सहा महिन्याच्या कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास तसेच ठोक वेतनावरील खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदरचा खर्च महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नंन्स) या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

6/1/2021

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

D:\Pramod Goyal\Tharav Standing\Harshal Patil Jr. Engineer Mudatwadh.docx

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ३३४

**विभाग - सामान्य प्रशासन**

**दिनांक** - ०६/०१/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील तलाव ठेका पद्धतीने मत्स्यसंवर्धनाकरिता देणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर -** सादर करणेंत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील तलाव सन २०१७ ते सन २०२० या तीन वर्षांकरिता ठेका पद्धतीने देण्यात आले होते. सदर तलावांची मुदत दि. ३१ मे २०२० पर्यंत असून सदर मुदत संपल्याने खालील नमुद तलावांची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक होते. त्यानुसारदि. ०३/०२/२०२० रोजी सदर नमुद तलावांच्या मागील सन २०१७ ते सन २०२० मधील उच्चत्तम रक्कमेवर १०% वाढ करुन किमान देकार निश्चित करुन निविदा प्रक्रियेचा प्रस्ताव मंजुर करुन दरपत्रके मागविण्यांत आली. सदर नमुद तलावांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | मागील मंजुर उच्चत्तम रक्कम | १०%वाढ करुन येणारी रक्कम | किमान देकार रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | कोरलमान तलाव | ८५,७८६/- | ८,५७९/- | ९४,३६५/- |
| २. | डेरा तलाव | २४,५००/- | २४५०/- | २६,९५०/ |
| ३. | काळुंजा तलाव | २,७०,०००/- | २७,०००/- | २,९७,०००/- |
| ४. | एंडाळे तलाव | ६५,९९०/- | ६५९९/- | ७२,५८९/- |
| ५. | कोरला तलाव | ४३,८२५/- | ४३८२/- | ४८,२०७/- |
| ६. | तळपा तलाव | ३५,५००/- | ३,५५०/- | ३९,०५०/- |
| ७. | कोळबाव तलाव | ४८,०००/- | ४,८००/- | ५२,८००/- |
| ८. | खुटलई तलाव | ६८,०००/- | ६,८००/- | ७४,८००/- |
| ९. | आंबड तलाव | १,०१,०००/- | १०,१००/- | १,११,१००/- |
| १०. | भाटेला तलाव | १,३६,१२५/- | १३,६१२/- | १,४९,७३७/- |
| ११. | कुंभेर तलाव | २,३९,७८६/- | २३,९७९/- | २,६३,७६५/- |
| १२. | नवाळे तलाव | १,२४,३९९/- | १२,४४०/- | १,३६,८३९/- |
| १३. | वाटाण तलाव | ३८,७८६/- | ३,८७९/- | ४२,६६५/- |
| १४. | गणेश तलाव | २९,९९५/- | २९९९/- | ३२,९९४/- |
| १५. | बाभळ तलाव | १२,१००/- | १,२१०/- | १३,३१०/- |
| १६. | भादले तलाव | ४२,९००/- | ४,२९०/- | ४७,१९०/- |

परंतु मा.आयुक्त यांनी सदर तलावांची निविदा प्रक्रिया रद्द करुन सदर तलावांची निविदा प्रक्रिया पुनःश्च नव्याने करणेकामी प्रस्तावावर शेरा दिला. त्यानुसार वरील अ.क्र. १ ते १३ तलावांची पुनःश्च निविदा प्रक्रिया करुन नव्याने दरपत्रके मागविण्यांत आली. त्यानुसार ९ तलावांची दरपत्रकेही प्राप्त झाली व त्यानुसार करारनामा करणेंत आला. मात्र कार्यादेश देण्यापुर्वी सदर प्रकरणी बारकाईने

तपासणी केली असता, सदर तलावांना प्रशासकीय ठराव करुन मान्यता घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे. सबब उपरोक्त नमुद तलावांची निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे.

तसेच अ.क्र. १४ व १५ मधील गणेश व बाभळ तलावाची सन २०१९ ते सन २०२१ मध्ये निविदा प्रक्रिया केली असता, गणेश तलावाची मंजुर रक्कमेपेक्षा कमी दराचे दर प्राप्त झाल्याने व बाभळ तलावाचे एकही दरपत्रक न झाल्याने निविदेची पुर्तता झालेली नव्हती. तसेच अ.क्र. १६ मधील भादले तलावाची सन २०१९ ते २०२१ मध्ये कोणत्याही प्रकारची निविदा न झाल्याने या तिनही तलावांची व अ.क्र. १, ५, १२, १३ या तलावांचे एकही दरपत्रक प्राप्त न झाल्याने या तलावांचा एकत्रित प्रस्ताव करुन अ.क्र. १, ५,१२, १३ या तलावांचे फेर जाहिर दरपत्रक व अ.क्र. १४, १५, व १६ चे जाहिर दरपत्रक सुचना प्रसिद्ध करुन दरपत्रके मागविणेंत आली. परंतु सदर तलावांचे मुदतीत एकही दरपत्रक प्राप्त झालेले नाही.

आता वरील नमुद सर्व तलाव सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षांकरिता मत्स्यसंवर्धनाकरिता ठेका पद्धतीने देणे आवश्यक असून सदर तलावांची खालीलप्रमाणे आधारभूत किंमत निश्चित करणे आवश्यक आहे. तरी त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | मागील मंजुर उच्चत्तम रक्कम | एक वर्षासाठी रक्कम | २०२१ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (२०२१) | २०२२ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (२०२२) | २०२३ (१०% वाढ) | आधारभूत किंमत (२०२३) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोरलमान तलाव | ८५,७८६/- | २८५९५ | २८५९ | ३१४५४ | ३१४५ | ३४५९९ | ३४६० | ३८०५९ |
| २. | डेरा तलाव | २४,५००/- | ८१६७ | ८१७ | ८९८४ | ८९८ | ९८८२ | ९८८ | १०८७० |
| ३. | काळुंजा तलाव | २,७०,०००/- | ९०००० | ९००० | ९९००० | ९९०० | १०८९०० | १०८९० | ११९७९० |
| ४. | एंडाळे तलाव | ६५,९९०/- | २१९९७ | २२०० | २४१९७ | २४२० | २६६१७ | २६६२ | २९२७९ |
| ५. | कोरला तलाव | ४३,८२५/- | १४६०८ | १४६१ | १६०६९ | १६०७ | १७६७६ | १७६८ | १९४४४ |
| ६. | तळपा तलाव | ३५,५००/- | ११८३३ | ११८३ | १३०१६ | १३०२ | १४३१८ | १४३२ | १५७५० |
| ७. | कोळबाव तलाव | ४८,०००/- | १६००० | १६०० | १७६०० | १७६० | १९३६० | १९३६ | २१२९६ |
| ८. | खुटलई तलाव | ६८,०००/- | २२६६७ | २२६७ | २४९३४ | २४९३ | २७४२७ | २७४३ | ३०१७० |
| ९. | आंबड तलाव | १,०१,०००/- | ३३६६७ | ३३६७ | ३७०३४ | ३७०३ | ४०७३७ | ४०७४ | ४४८११ |
| १०. | भाटेला तलाव | १,३६,१२५/- | ४५३७५ | ४५३७ | ४९९१२ | ४९९१ | ५४९०३ | ५४९० | ६०३९३ |
| ११. | कुंभेर तलाव | २,३९,७८६/- | ७९९२९ | ७९९३ | ८७९२२ | ८७९२ | ९६७१४ | ९६७१ | १०६३८५ |
| १२. | नवाळे तलाव | १,२४,३९९/- | ४१४६६ | ४१४७ | ४५६१३ | ४५६१ | ५०१७४ | ५०१७ | ५५१९१ |
| १३. | वाटाण तलाव | ३८,७८६/- | १२९२९ | १२९३ | १४२२२ | १४२२ | १५६४४ | १५६४ | १७२०८ |
| १४. | गणेश तलाव | २९,९९५/- | ९९९८ | १००० | १०९९८ | ११०० | १२०९८ | १२१० | १३३०८ |
| १५. | बाभळ तलाव | १२,१००/- | ४०३३ | ४०३ | ४४३६ | ४४४ | ४८८० | ४८८ | ५३६८ |
| १६. | भादले तलाव | ४२,९००/- | १४३०० | १४३० | १५७३० | १५७३ | १७३०३ | १७३० | १९०३३ |

तीन वर्षाच्या कालावधीसाठी प्रत्येक तलावाची आधारभूत किंमत

| अ.क्र. | तलावाचे नाव | आधारभूत किंमत (सन २०२१ ते सन २०२३) |
|---|---|---|
| १. | कोरलमान तलाव | ३८०५९ |
| २. | डेरा तलाव | १०८७० |
| ३. | काळुंजा तलाव | ११९७९० |
| ४. | एंडाळे तलाव | २९२७९ |

| | | |
|---|---|---|
| ५. | कोरला तलाव | १९४४४ |
| ६. | तळपा तलाव | १५७५० |
| ७. | कोळबाव तलाव | २१२९६ |
| ८. | खुटलई तलाव | ३०१७० |
| ९. | आंबड तलाव | ४४८११ |
| १०. | भाटेला तलाव | ६०३९३ |
| ११. | कुंभेर तलाव | १०६३८५ |
| १२. | नवाळे तलाव | ५५१९१ |
| १३. | वाटाण तलाव | १७२०८ |
| १४. | गणेश तलाव | १३३०८ |
| १५. | बाभळ तलाव | ५३६८ |
| १६. | भादले तलाव | १९०३३ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरांवर शासकीय भरणा म्हणजेच जी.एस.टी. व आय.टी. मंजुर दरांव्यतिरिक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त भरणा करावयाचा आहे. त्यानुसार तलावांची वरील तक्त्यात दर्शविलेल्या आधारभूत किंमत निश्चित करुन त्या किंमतीनुसार सन २०२१ ते सन २०२३ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी स्वतंत्ररित्या प्रत्येक तलाव मत्स्यसंवर्धनाकरिता ठेका पद्धतीने देणेकामी दरपत्रके मागविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

**ठरावाचा निर्णय** - वरीलप्रमाणे प्रस्तावानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील नमुद तलाव सन २०२१ ते सन २०२३ (दि. ०१ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या वर्षांकरिता मत्स्यसंवर्धनाकरिता ठेका पद्धतीने देणेकामी खालील नमुद तलाव स्वतंत्ररित्या प्रत्येक तलाव मत्स्यसंवर्धनाकरिता ठेका पद्धतीने देणेकामी दरपत्रके मागविणेकामी कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे.

| अ.क्र. | तलावाचे नाव | आधारभूत किंमत (सन २०२१ ते सन २०२३) |
|---|---|---|
| १. | कोरलमान तलाव | ३८०५९ |
| २. | डेरा तलाव | १०८७० |
| ३. | काळुंजा तलाव | ११९७९० |
| ४. | एंडाळे तलाव | २९२७९ |
| ५. | कोरला तलाव | १९४४४ |
| ६. | तळपा तलाव | १५७५० |
| ७. | कोळबाव तलाव | २१२९६ |
| ८. | खुटलई तलाव | ३०१७० |
| ९. | आंबड तलाव | ४४८११ |
| १०. | भाटेला तलाव | ६०३९३ |
| ११. | कुंभेर तलाव | १०६३८५ |
| १२. | नवाळे तलाव | ५५१९१ |
| १३. | वाटाण तलाव | १७२०८ |
| १४. | गणेश तलाव | १३३०८ |
| १५. | बाभळ तलाव | ५३६८ |
| १६. | भादले तलाव | १९०३३ |

मा.आयुक्त तथा प्रशासक ६/१/२०२१
वसई-विरार शहर महानगरपालिका

G:\ashwini\Samanya 2020-21\Tharav1.docx16

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. ३३५ | दिनांक : ०६/०१/२०२१

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए' कार्यक्षेत्रातील बोळींज विरार (प.) येथील वॉर्ड क्र.३२ मध्ये दिवलईपाडाच्या कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्रासाठी (G+२) इमारत बांधणे व इतर कामे करणे.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.१,८५,०२,५५३/-

३) प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची २ रुग्णालये, ३ माता बाल संगोपन केंद्रे तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. या दवाखान्यापैकी प्रभाग समिती - ए कार्यक्षेत्रातील बोळींज विरार (प.) येथील दिवलईपाडाच्या कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्र सुरु केल्यास सदर माता बाल संगोपन केंद्रात गरोदर माता तपासणी व प्रसुती करणे इत्यादी सेवा पुरविण्यात येऊन नागरिकांना या सेवा सुविधांचा लाभ घेता येणे शक्य होणार आहे. महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - ए अंतर्गत येणाऱ्या वाढत्या लोखसंख्येस सेवा सुविधा देणेसाठी कार्यरत असलेल्या बोळींज विरार (प.) येथील दिवलईपाडाच्या कोव्हीड विलगीकरणाच्या इमारतीच्या जागेत माता बाल संगोपन केंद्र सुरु करणेसाठी अस्तित्वातील (G+२) इमारतीची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन लगत नविन इमारत (G+२) बांधणे आवश्यक आहे.

४) कामाचे स्वरुप :- माता बाल संगोपन केंद्रासाठी इमारत (G+२) बनविणे व अस्तित्वाती इमारतची योग्य ते बदल करुन दुरुस्ती करणे कामी महानगरपालिकेमार्फत नियुक्त असलेल्या पॅनलवरील तांत्रिक सल्लागारांपैकी मे.के.के.टेक्नोट्रेड ह्यांनी सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडे तयार केले आहे. सदर कामी अस्तित्वातील इमारती डागडुजी करणे व लगत दोन मजल्याची इमारत बांधणेच्या बाबी अंदाजपत्रकमध्ये समाविष्ट केल्या आल्या आहेत. नविन इमारतीमध्ये स्ट्रेचर लिफ्ट, ओव्हर हेड पाण्याची टाकी, प्रत्येक मजल्यावर प्रसाधन गृह बांधण्यात येणार आहे. सदर इमारतीचे क्षेत्रफळ ३२४ चौ.मी. आहे. तसेच दोन्ही इमारतीमध्ये माता बालसंगोपन केंद्रासाठी आवश्यक विविध वॉर्ड, अडमिन रुम, क्लेरीकल रुम, डॉक्टर रुम, काऊन्सीलर रुम, नर्स रुम, ऑपरेशन रुम, रेकॉर्ड रुम, लॅब व फॉर्मसी रुमची व्यवस्था करण्यात येणार आहे. या माता बाल संगोपन केंद्रामध्ये अे.एन.सी. व पिडीयाट्रीक ओपीडी रुमची करण्यात येणार आहे असून अे.एन.सी. व पी.एन.सी. वॉर्डची व्यवस्था करण्यात येणार आहे.

तसेच सदर इमारतीसमोर वेटींग शेड बांधण्यात येणार आहे. सदर परिसरातील कंपाऊंड भिंतीची डागडुजी करण्यात येणार आहे. सदर कामाचे रक्कम रु.१,८५,०२,५५३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर ठिकाणी कोव्हीड विलगीकरणाची (G+२) इमारत अस्तित्वात आहे.

६) जागेची मालकी :- वसई - विरार शहर महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :-

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :-

ब) मुळ तरतूद :- रु.

क) शिल्लक :- रु.

ड) तरतूद नियंत्रण नोंदवही क्र. पृष्ठ क्र. अ.क्र.

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. नं.१२८ पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

१०) ठराव :- महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए अंतर्गत येणाऱ्या वाढत्या लोकसंख्येस सेवा सुविधा देणेसाठी बोळींज, विरार (प.) येथील दिवळईपाडा येथील कोव्हीड विलगीकरण इमारतीच्या परिसरामध्ये माता बाल संगोपन केंद्र सुरु करणेसाठी अस्तित्वातील इमारतीची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे व लगत नविन इमारत (G+२) बांधणे कामी रक्कम रु.१,८५,०२,५५३/- च्या इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

११/१/२०२४

आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. ३३६

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-०७/०१/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती (ए) विरार (प),म्हाडा वसाहत मधील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेन्तर्गत दिवे दुरुस्ती करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**१) अंदाजपत्राकिय रक्कम** :- २,९९,३१९/- (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

**२) कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल म्हाडा वसाहत मार्फत रोडवर विद्युत पोल उभारुन दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर ठिकाणी वरील नागरिकांच्या सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेमधील दिवे बंद असल्याबाबत तक्रारी सी.आर.एम.पोर्टल यांचे मार्फत कार्यालयात प्राप्त होत आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने परिसरात प्रत्यक्ष पाहणी दिवे बंद असल्याने दिवाबत्ती दुरुस्ती करिता सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

**३) जागेची मालकी** :- महानगरपालिका इमारत, विरार (प)

**४) कामाचे स्वरुप** :- HPSV लॅम्प,२५० W-१०० नग, HPSV लॅम्प,१५० W-२५ नग, इग्नेटर - १२५ नग,कॉपर ब्लास्ट १५० W-२५ नग, कॉपर वायर - २ X २.५ Sq.mm.-१२५ मी

**५) लेखाशिर्षक** :- विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील " विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल. सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

---

**प्रस्तावाचा ठराव** :- प्रभाग समिती (ए) विरार (प),म्हाडा वसाहत मधील सार्वजनिक दिवाबत्ती दुरुस्ती करणे व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व(२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम २,९९,३१९/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई -विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५**
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. ३३५ | विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-०५/०१/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल ओलांडा नाका दुभाजकातील पोलची नादुरुस्त केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

1) **अंदाजपत्राकिय रक्कम** :- २,९९,५५०/- (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

2) **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल ओलांडा नाका दुभाजकातील विद्युत पोलची केबल नादुरुस्त झाली असुन सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता रस्त्यावरील विद्युत पोलची केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करण्याकरिता सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

3) **जागेची मालकी** :- महानगरपालिका इमारत, विरार (प)

4) **कामाचे स्वरुप** :- आर्मड केबल आर्मड केबल ४x२५sq.mm-६१२ मी, टेंच-५४०मी, DWC पाईप-५७६ मी,जी.आय.पाईप - १० मी.

५) **लेखाशिर्षक** :- विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील " विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल. सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

---

**प्रस्तावाचा ठराव** :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल ओलांडा नाका दुभाजकातील पोलची नादुरुस्त केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व (२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम २,९९,५५०/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई -विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५**
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. ३३८ — विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-०७/०३/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल म्हाडा वसाहत रोडवर स्वयंचलित टायमर व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

1) **अंदाजपत्राकिय रक्कम** :- २,४५,२००/- (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

2) **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल म्हाडा वसाहत मार्फत रोडवर विद्युत पोल उभारुन दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. सदर ठिकाणी वरील नागरिकांच्या सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था वेळेत चालु होत नसल्याच्या तक्रारी सी.आर.एम.पोर्टल यांचे मार्फत कार्यालयात प्राप्त होत आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने परिसरात प्रत्यक्ष पाहणी केली असता स्वयंचलित टायमर व्यवस्था नसल्याने रस्त्यावरील लाईन वेळेत चालु करत नाही. तरी नविन स्वयंचलित टायमर व्यवस्था करण्याकरिता सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे टायमर व्यवस्था करणे आवश्यक आहे.

3) **जागेची मालकी** :- महानगरपालिका इमारत, विरार (प)

4) **कामाचे स्वरुप** :- टायमर बॉक्स -६ नग,FPMCB ६A ते ३२ A -२ नग, इलेक्ट्रॉनिक टाईम स्विच - २ नग, टु पोल पॉवर कॉन्ट्रॅक्टर २३ V - ३ नग ,ॲल्युमिनियम पट्टी आणि बार - ३ कि.ग्र.

५) **लेखाशिर्षक** :- विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील " विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल. सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

---

**प्रस्तावांचा ठराव** :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल म्हाडा वसाहत रोडवर स्वयंचलित टायमर व्यवस्था करणे व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व(२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम २,४५,२००/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३३८ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-०७/०९/२०२१

**प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल म्हाडा वसाहत रोडवरील विद्युत पोलची नादुरुस्त केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**१) अंदाजपत्राकिय रक्कम** :- २,९८,६४५/- (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

**२) कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल म्हाडा वसाहत मार्फत रोडवर विद्युत पोल उभारुन दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता रस्त्यावरील विद्युत पोलची केबल नादुरुस्त झाल्यामुळे केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करण्याकरिता सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

**३) जागेची मालकी** :- -

**४) कामाचे स्वरुप** :- आर्मड केबल आर्मड केबल ४x२५sq.mm-४५५ मी, टेंच-४०० मी, DWC पाईप-३६० मी,जी.आय.पाईप - ४५ मी.

**५) लेखाशिर्षक** :- विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील " विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल. सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

**प्रस्तावाचा ठराव** :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल म्हाडा वसाहत रोडवरील विद्युत पोलची नादुरुस्त केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे त्याअनुषंगिक विद्युतीय कामे कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व(२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम रु. २, ९८,६४५/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. ३४० विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-०७/०३/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल बोळींज नाका ते डी.टी.बार पर्यंत विद्युत पोलची नादुरुस्त केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**१) अंदाजपत्राकिय रक्कम** :- २,९८,१२३/- (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

**२) कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल बोळींज नाका ते डी.टी.बार पर्यंत विद्युत पोलची केबल नादुरुस्त झाली असुन सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता रस्त्यावरील विद्युत पोलची केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करण्याकरिता सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

**३) जागेची मालकी** :- महानगरपालिका इमारत, विरार (प).

**४) कामाचे स्वरुप** :- आर्मड केबल आर्मड केबल ४x२५sq.mm-६१२ मी, टेंच-५४० मी, DWC पाईप-५७६ मी,जी.आय.पाईप - ८ मी.

**५) लेखाशिर्षक** :- विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील " विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था " या लेखाशिर्षकातील रक्कम १०,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल. सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

---

**प्रस्तावाचा ठराव** :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल बोळींज नाका ते डी.टी.बार पर्यंत विद्युत पोलची नादुरुस्त केबल बदली करुन नविन लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व (२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम २,९८,१२३/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ३४९

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन
दिनांक :-०८/०९/२०२१

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चाळी, झोपडपट्टी व अरुंद रस्ते, रहिवाशी ईमारती मधील असलेल्या सामुहिक व सार्वजनिक शौचालय यांच्या सेप्टीक टँक उपसा करणेकामी ५ मैला टँकर खरेदी करुन मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ रोजी झाली असून भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई या शहराच्या लगतचे शहर म्हणून उदयास आले आहे. मुंबई शहरात कामानिमित्त येणाऱ्या नोकदारांनी राहण्यासाठी उत्तम शहर म्हणून वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्राला पसंती देण्यात येत आहे. सन २०११ च्या जनगणेनुसार वसई विरार शहराची लोकसंख्या १२,२२,३९० एवढी असून सद्यस्थितीत अंदाजे २० लक्ष लोकसंख्या आहे. शहरात मोठया प्रमाणात नागरी वस्ती निर्माण झाल्या आहे. सदरील वस्त्यांमध्ये मोठया प्रमाणात रहिवाशी ईमारती उभ्या झाल्या आहे. मनपा क्षेत्रात एकुण ८,२४,२१८ मालमत्ता असून त्यातील ७,०२,२०२ एवढे निवासी व १,२२,०१६ एवढे वाणिज्य मालमत्ता आहेत. सदरील मालमतांमध्ये एकूण ८८,६६५ एवढे मैला टाकी (सेप्टीक टँक) आहेत. तरी दैनंदिन निर्माण होणारे शौच टाकीतील सांडपाणी तक्रारी नुसार संक्शन करणे आवश्यक व गरजेचे आहे.

तसेच सदरील खाजगी सेप्टीक टँक स्वच्छ करतेवेळी मोठया प्रमाणात नागरीकांचा मृत्यु झाला आहे. त्यानुषंगाने हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणीसाठी दि.३१ जूलै २०१९ च्या अधिसुचने अन्वये जिल्हा स्तरावर व उपविभागीय स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मॅन्युअल स्कॅव्हेजर्सचे काम करताना दुषीत गटारामध्ये मृत्यु पावलेल्या कामगारांवर अवलंबून असणाऱ्या कुटूंबातील सदस्यांना रु.१० लक्ष नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्याचे पुनर्वसन करणे अधिनियम २०१३ (२०१२ चा २९) दि.६ डिसेंबर २०१३ पासून लागू केला आहे. या अधिनियमांतील केंद्र शासनाने नियम केले असून सदर नियम दि.१२ डिसेंबर २०१३ च्या भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यानुषांगने हाताने मैला उचलणे हा कायदेशीर

गुन्हा असल्याने मनपा हद्दीतील रहिवाशी इमारतीतील व सार्व.शौचायलयाच्या सेप्टीक टँक स्वच्छ करणेसाठी खालीलप्रमाणे मैला टँकर उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | प्रभाग समिती | संख्या | उपलब्ध मैला टँकर | | क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| | | | मनपाच्या मालकीचे | अभिकर्ता मालकीचे | |
| १ | A | | √ | - | ६००० ली. (ट्रक माऊंटेड) |
| २ | B | | - | - | - |
| ३ | C | | - | - | - |
| ४ | D | | - | - | - |
| ५ | E | | - | √ | ३००० ली. (टेम्पो माऊंटेड) |
| ६ | F | | - | √ | ३००० ली. (टेम्पो माऊंटेड) |
| ७ | G | | √ | - | ३००० ली. (ट्रॅक्टर माऊंटेड) |
| ८ | H | | √ | - | ६००० ली. (ट्रक माऊंटेड) |
| ९ | I | | √ | - | ६००० ली. (ट्रक माऊंटेड) |

परंतु वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये चाळी, झोपडपट्टी भागात अरुंद रस्ते असल्यामुळे सदरील ठिकाणी असलेल्या सेप्टीक टँक स्वच्छ करणेसाठी मनपाकडे उपलब्ध असलेले मैला टँकरचा आकार मोठा असल्याने वरीलप्रमाणे असणाऱ्या ठिकाणी सेप्टीक टँक स्वच्छ करण्यास मोठया प्रमाणात अडचणी येत असतात. तरी सदरील सेप्टीक टँक स्वच्छ करणेकामी खालीलप्रमाणे ट्रॅक्टर मांऊटेड मैला टँकरची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | आवश्यक वाहनाची संख्या | प्रती वाहनाची किंमत | ५ मैला टँकरचा दर | GST १८% सह एकूण होणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मैला टँकर (३५०० ली.क्षमतेचे - ब्लो बँक सिस्टम मशिन) | ५ | रु.७,५०,०००/- | रु.३७,५०,०००/- | रु.४४,२५,०००/- |

तरी वरीलप्रमाणे मैला टँकर खरेदी केल्यास झोपडपट्टी परिसरातील सामुहिक शौचालय, सार्वजनीक शौचालय तसेच घरगुती शौचालय येथील सेप्टीक टँक स्वच्छ करण्यास उपयुक्त ठरेल. तरी सदरील वाहन खरेदी करण्यास GST १८% सह अंदाजे रक्कम रु.४४,२५,०००/- (अक्षरी रक्कम रु.चव्वेचाळीस लक्ष पंचवीस हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षीत आहे.

सदरील खर्च २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी** या लेखाशिर्षाच्या अंतर्गत तरतुद **रक्कम रु.१७ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी मैला टँकर खरेदी करुन मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

ठराव निर्णय :-

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील चाळी, झोपडपट्टी व अरुंद रस्ते, रहिवाशी ईमारती मधील असलेल्या सामुहिक व सार्वजनिक शौचालय यांच्या सेप्टीक टँक उपसा करणेकामी ५ मैला टँकर ई-निविदा प्रकिया करुन खरेदी करणेस व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## प्रशासकीय ठराव

**ठराव क्र.:-** ३४२ **दिनांक :-** ०८/०३/२०२१

---

**विषय :-** व्यवसाय परवाना /नाहरकत दाखला, नुतनीकरण फी, साठा परवाना दर निश्चिती करणे बाबत.

**संदर्भ :-** १) मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३५ दि. १३/०२/२०१९ रोजीचा ठराव.
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ८२ दि.११/०७/२०१९ रोजीचा ठराव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व्यवसाय परवाना / नाहरकत दाखला, नुतनीकरण फी, साठा परवाना फी तत्कालीन नगरपरिषद व ग्रामपंचायत कालावधी पासुन निश्चित केलेल्या दराप्रमाणे वसुल करण्यात येत होती. भुतपुर्व नगरपालिकांचे परवाना फी दर वेगवेगळे असल्याने एकसुत्रीपणा नव्हता तसेच परवाना फी मध्ये वाढ न केल्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात ज्याप्रमाणे भर पडणे आवश्यक होते त्या प्रमाणात फी मध्ये भर पडत नव्हती करीता संदर्भ क्र. १ अन्वये मा. सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३५ दिनांक १३/०२/२०१९ नुसार दरवाढीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करण्यास मंजुरी दिले नंतर संदर्भ क्र. २ अन्वये मा. स्थायी समिती सभेने ठराव क्र.८२ दिनांक ११/०७/२०१९ रोजी ठराव पारीत करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३,३७६,३८६ व अधिनियमाचे प्रकरण १८ अन्वये व्यवसाय परवाना / ना-हरकत दाखला, साठा नुतनीकरण फी, साठा परवानामध्ये वाढ करुन खालील प्रमाणे दर निश्चित करण्यात आले आहेत.

**परवाना फी / नुतनीकरण फी**

| अ.क्र. | क्षेत्रफळ | दर (रु.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १ ते १०० चौ फुटापर्यंत | १५०० |
| २ | १०१ ते २५० चौ फुटापर्यंत | ३००० |
| ३ | २५१ ते ५०० चौ फुटापर्यंत | ५००० |
| ४ | ५०१ ते १००० चौ फुटापर्यंत | ७००० |
| ५ | १००१ ते २५०० चौ फुटापर्यंत | १०,००० |
| ६ | २५०१ ते ३५०० चौ फुटापर्यंत | १२,००० |
| ७ | ३५०१ ते ५००० चौ फुटापर्यंत | १४,००० |
| ८ | ५००१ ते ६५०० चौ फुटापर्यंत | १८,००० |
| ९ | ६५०१ ते ८००० चौ फुटापर्यंत | २५,००० |
| १० | ८००१ ते १०,००० चौ फुटापर्यंत | ३०,००० |
| ११ | १०,००० चौ फुटाच्या पुढे | ५०,००० |

**तात्पुरत्या स्वरुपाच्या कालावधीकरिता परवाना फी दर**

| अ.क्र | कालावधी | दर (रु.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १ ते १० दिवस | २५०० |
| २ | ११ ते १५ दिवस | ५००० |
| ३ | १६ ते ३० दिवस | १०,००० |
| ४ | ३१ ते ६० दिवस | २०,००० |
| ५ | ६० ते ९० दिवस | ३०,००० |

परवानाधारकाने व्यवसाय परवाना / नाहरकत दाखला, नुतनीकरण फी, साठा परवाना मुदत संपण्याच्या ३० दिवसा आधी नुतनीकरण करण्यात येऊन अद्ययावत करणे बंधनकारक आहे, तसे न केल्यास सदर व्यवसाय परवाना धारक यांना विलंब शुल्क आकारण्यात येईल. त्यांच्या तपशिल पुढील प्रमाणे आहे.

## विलंब आकार

| अ.क्र. | कालावधी | परवाना फी च्या (टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | १ ते ३ महिने | १०% |
| २ | ४ ते ६ महिने | २०% |
| ३ | ७ ते ९ महिने | ३०% |
| ४ | ९ ते १२ महिने | ४०% |
| ५ | पुढील प्रत्येक ३ महिन्यानतंर | १०% |

वसई- विरार शहर महानगरपालिकेकडुन विविध परवाने निर्गमित करणे व त्याकामी फी आकारणी करण्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. विविध उदयोगधंदयाकरिता परवाना देण्यासाठी पुढीलप्रमाणे कागदपत्रे संबधिताकडुन प्राप्त करुन घेणे योग्य राहील असे वाटते.

१. बांधकाम परवानगी
२. भोगवटा प्रमाणपत्र
३. परवाना धारकाचे शासकीय ओळखपत्र (पॅन कार्ड व आधारकार्ड)
४. नोंदणीकृत खरेदीखत / भाडेकरार
५. मालमत्ता कर भरणापावती (चालू वित्तीय वर्षाची)
६. पाणीपट्टी कर भरणा पावती (चालू वित्तीय वर्षाची)
७. ऑथरेटी लेटर्स (आवश्यकते नुसार)
८. संचालकाचे नाहरकत प्रमाणपत्र (आवश्यकते नुसार)
९. अग्निशमन नाहरकत दाखला
१०. सत्यप्रतिज्ञापत्र
११. गुमास्ता लायन्सस (आवश्यकते नुसार)
१२. भागीदारी करारनामा
१३. भागीदाराचे नाहरकत प्रमाणपत्र
१४. कंपनी ठराव (आवश्यकते नुसार)
१५. मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र (परवान्या करिता)

वरील अटी शर्तीची पुर्तता केल्यानतंर दिला जाणारा सदरचा ना हरकत दाखला हा प्राथमिक स्वरुपाचा असेल. प्रत्यक्ष व्यवसायासाठी आवश्यक त्या इतर सर्व सक्षम प्राधिकरणाच्या परवानग्या /दाखले प्राप्त करुन घेतल्यानंतरच व्यवसाय सुरु करण्याची जबाबदारी संबधित व्यवसायिकाची राहील. त्याचप्रमाणे ना-हरकत दाखल्याचे नुतनीकरण करण्यासाठी व्यवसायिकाकडुन महानगरपालिकेकडे सादर केलेल्या कागदपत्रासोबत इतर समक्ष प्राधिकरणाकडुन प्राप्त झालेल्या परवानग्या/ दाखल्याच्या साक्षांकित प्रति सादर न केल्यास महानगरपालिकेकडुन देण्यात आलेल्या नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणेत येणार नाही .

मा. उपायुक्त (परवाना विभाग) मुख्यालय, विरार यांचे स्तरावर देण्यात येतील. उपरोक्त बाबी वगळता व्यवसाय परवाने / नाहरकत दाखले / नुतनीकरण दाखले, साठा परवाना हे सर्व संबधित प्रभाग समिती स्तरावर देण्यात यावेत.

खालील प्रस्तावित दरांना मंजूरी देण्यात येते.

**परवाना फी / नुतनीकरण फी प्रस्तावित दर**

| अ.क्र | क्षेत्रफळ | दर (रु.मध्ये) |
|---|---|---|
| १ | १ ते १०० चौ फुटापर्यत | ७५० |
| २ | १०१ ते २५० चौ फुटापर्यत | १५०० |
| ३ | २५१ ते ५०० चौ फुटापर्यत | २५०० |
| ४ | ५०१ ते १००० चौ फुटापर्यत | ३५०० |
| ५ | १००१ ते २५०० चौ फुटापर्यंत | ५००० |
| ६ | २५०१ ते ३५०० चौ फुटापर्यंत | ६००० |
| ७ | ३५०१ ते ५००० चौ फुटापर्यंत | ७००० |
| ८ | ५००१ ते ६५०० चौ फुटापर्यंत | ८००० |
| ९ | ६५०१ ते ८००० चौ फुटापर्यंत | १०००० |
| १० | ८००१ ते १०,००० चौ फुटापर्यंत | १५००० |
| ११ | १०,००० चौ फुटाच्या पुढे | २०००० |

**तात्पुरत्या स्वरुपाच्या कालावधीकरिता परवाना फी प्रस्तावित दर**

| अ.क्र. | कालावधी | क्षेत्रफळ (चौ.फुट) | दर (रु.मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | १ ते ०७ दिवस | २५० चौ.फुट पर्यंत | १००० |
| | | २५० चौ.फुटाच्या पुढे | २००० |
| २ | ०८ ते १५ दिवस | २५० चौ.फुट पर्यंत | २००० |
| | | २५० चौ.फुटाच्या पुढे | ३००० |
| ३ | १६ ते ३० दिवस | २५० चौ.फुट पर्यंत | ३००० |
| | | २५० चौ.फुटाच्या पुढे | ४००० |
| ४ | ३१ ते ६० दिवस | २५० चौ.फुट पर्यंत | ५००० |
| | | २५० चौ.फुटाच्या पुढे | ७५०० |
| ५ | ६० ते ९० दिवस | २५० चौ.फुट पर्यंत | १०,००० |
| | | २५० चौ.फुटाच्या पुढे | १५००० |

## विलंब आकार

| अ.क्र. | कालावधी | परवाना फी च्या (टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | १ ते ३ महिने | १०% |
| २ | ४ ते ६ महिने | २०% |
| ३ | ७ ते ९ महिने | ३०% |
| ४ | ९ ते १२ महिने | ४०% |
| ५ | पुढील प्रत्येक ३ महिन्यानंतर | १०% |

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५**
**दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७**
**ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com**

---

**प्रशासकीय ठराव क्र. :-** ३४३ **विभाग :- वाहन**

**दिनांक :-** ०८/०३/**२०२१**

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभुमीवर बसविण्यात येणाऱ्या १० विलगीकरण मशिन (Segregatin trommel) मध्ये दैनंदिन कचरा टाकण्यासाठी क्षेपणभुमीवर ६ बॅकहो लोडर (जेसीबी) मशिन वाहन विभागाकडून ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करुन मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलनाचे काम घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात येते. सदरील कामासाठी २० झोन तयार करुन २० अभिकर्त्यांची नियुक्ती केली आहे. कचरा संकलनाच्या कामासाठी कॉम्पॅक्टर -५७, टिपर -११४, डंपर -६४, ट्रॅक्टर -२०, हातगाडी -२०८, ट्रायसिकल - २१९ एवढी वाहने असून सदरील वाहनांमार्फत गोखिवरे क्षेपाभुमीवर प्रती दिन ६५० टन कचरा टाकण्यात येत आहे. सद्यस्थितीत गोखिवरे क्षेपणभुमीवर अंदाजे १० ते १२ लक्ष टन कचरा प्रक्रियेविना जमा झालेला आहे. केंद्र शासन व महाराष्ट्र शासनच्या तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या मागदर्शनानुसार दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये कचऱ्याचे विलगीकरण करणे आवश्यक आहे.

तरी सदरील नियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी मनपाने नव्याने १० कॉम्पॅक्टर व ५० टिपर नव्याने खरेदीचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार कचरा संकलनासाठी सद्यस्थितीमध्ये १५००० एवढया २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन्स खरेदी करुन दैनंदिन कचऱ्याचे विलगीकरण करण्याचे मनपाने नियोजले आहे. क्षेपणभुमीवर दैनंदिन कचरा विलगीकरण करण्याचे मनपाचे विचारधीन असल्याने मनपाने क्षेपणभुमीवरील सद्यस्थित असणाऱ्या कचऱ्याचे विलगीकरण करणेसाठी १० विलगीकरण मशिन **(Segregatin trommel)** खरेदी केल्या आहे. सदरील मशिन मधून दैनंदिन येणारा कचरा विलगीकरण करण्यात येतो. परंतु सदरील कचरा १० विलगीकरण मशिनवर येणारा सद्यस्थितीतील ६५० मेट्रीक टन कचरा १० विलगीकरण मशिन (Segregatin trommel) वर टाळण्यासाठी ४ बॅकहो लोडर (जेसीबी) मशिनची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहनांची संख्या | प्रती बॅकहो लोडर (जेसीबी) मशिनचा दर | १८% GST | १८% GST सह **६ बॅकहो लोडर (जेसीबी) मशिनसाठी होणारा एकुण खर्च** |
|---|---|---|---|---|---|
| १ | बॅकहो लोडर (जेसीबी) मशिन | ६ | रु.३०,००,०००/- | रु.३५,४०,०००/- | रु.२,१२,४०,०००/- |

तरी वरीलप्रमाणे ६ बॅकहो लोडर (जेसीबी) मशिन खरेदी केल्यास क्षेपणभुमीवर येणारा दैनंदिन व सद्यस्थितीत कचरा १० विलगीकरण मशिनवर टाकण्यास सोयीचे होईल. तसेच पावसाळयापूर्वी प्रभाग समिती निहाय असणारे छोटे नाले स्वच्छ करण्यास उपयोग होऊ शकतो. तरी मा. आयुक्त महोदयांनी सदरील कामाकरिता ६ बॅकहो लोडर (जेसीबी) मशिन खरेदी करणेबाबत सुचित केले आहे. तरी सदरील ४ बॅकहो लोडर (जेसीबी) मशिन खरेदीसाठी १८ % GST सह अंदाजे **रक्कम रु.२,१२,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी बारा लक्ष चाळीस हजार मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत असून सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील **वाहन खरेदी/रोड रोलर खरेदी** या लेखाशिर्षाच्या अंतर्गत तरतुद **रक्कम रु.१७ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी **६** बॅकहो लोडर (जेसीबी) मशिन वाहन विभागाकडून ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करुन मिळणेकामी आपल्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :-** सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी ३DX (७६ हॉर्स पॉवर ते ९६ हॉर्स पॉवर क्षमतेचे) ६ नग बॅकहो लोडर खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करणेस व त्याकामी होणाऱ्या अंदाजित रक्कम रु.२,१२,४०,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र. :-** ३४४

**विभाग :- वाहन**
**दिनांक :-**०८/०३/२०२१

**विषय :- सार्वजनिक दिवाबत्ती देखभाल दुरुस्ती करिता नविन हायड्रोलिक लॅडर वाहन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक रस्त्यावरील, उदयान, तलाव, मैदान, स्मशानभुमी इ. ठिकाणी विविध उंचीचे (६मी, ९मी, ११मी, १२मी , १६मी व २०मी) **३९,६११** पोलवर सुमारे **४५,९३८** दिवे लावून दिवाबत्तीची व्यवस्था करणेंत आली आहे व त्याची दैनंदिन देखभाल दुरुस्ती महानगरपालिका प्रभाग निहाय विद्युत विभागामार्फत करण्यात येते.

विद्युतीय देखभाल दुरुस्तीची कामे करणेकरीता साहित्यांची व कर्मचाऱ्यांचे ने-आण करावी लागते. याकरिता, महानगरपालिकेची खालील प्रमाणे प्रभाग-निहाय १) हायड्रोलिक लॅडर व २) युटिलिटी वाहने उपलब्ध आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**१) हायड्रोलिक लॅडर वाहन**

| अ.क्र | प्रभाग समिती | वाहन क्रमांक |
|---|---|---|
| १ | ए, विरार (प), बोळींज | MH ४८ E ०१४६ |
| | सी, चंदनसार | |
| २ | बी, विरार (पुर्व) | MH ०४ AM ०२०७ |
| | डी, आचोळे, नालासोपारा (पुर्व) | |
| | ई, नालासोपारा (प) | |
| ३ | एफ, धानिव / पेल्हार | MH ४८ C ०१६० |
| ४ | जी, वालिव | MH ४८ C ०१६१ |
| | एच, नवघर (पु) | |
| ५ | आय, वसई गांव | MH ४८ E ०१४५ |

तरी वर नमुद केलेप्रमाणे प्रभाग समिती "ए" विभागातील हायड्रोलिक लॅडर वाहन हे प्रभाग समिती "ए" व "सी" करिता वापरणेंत येते. प्रभाग समिती "ई" विभागातील हायड्रोलिक लॅडर वाहन हे प्रभाग समिती "बी","डी" व "ई" करिता वापरणेंत येते. प्रभाग समिती "एफ" विभागातील हायड्रोलिक लॅडर वाहन हे प्रभाग समिती "एफ" करिता वापरणेंत येते. प्रभाग समिती "एच" विभागातील हायड्रोलिक लॅडर वाहन हे प्रभाग समिती "एच" व "जी" करिता वापरणेंत येते व प्रभाग समिती "आय" विभागातील हायड्रोलिक लॅडर वाहन हे प्रभाग समिती "आय" करिता वापरणेंत येते.

## २) युटिलिटी वाहन

| अ. क्र | प्रभाग समिती | परीसर | वाहन क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | ए | विरार (प) शहर परीसर, बोळींज, उमराळे, करमाळे, कोफराड, राजोडी रोड, नवापुर, काठेपाडा, उंबरगोठण, आगाशी, वटार, चिखलडोंगरी, रेतीबंदर, नारंगी, डोंगरपाडा, भंडार आळी परिसर | MH ४८ BM ६८९६ |
| | सी | विरार (पु) शहर परीसर, चंदनसार, फुलपाडा, जिवदानी रोड, शिरसाड, कोशिंबे, कसराळी, दहिसर, फणसपाडा, वैतरणा, संपुर्ण विरार फाटा परिसर | MH ४८ BM ६८८९ |
| २ | बी | विरार / नालासोपारा (पु) शहर परीसर, मनवेल पाडा, मारेगांव, नगिनदास पाडा, विनायक नगर, दत्तमंदिर, विजयनगर, कारगीलनगर, सेंट्रलपार्क, प्रगती नगर, ओस्वाल नगरी, तुळींज परीसर | MH ४८ BM ६८९० |
| | डी | गालानगर, एव्हरशाईन, वसंत नगरी, आचोळे गांव परिसर, वैतीवाडी, संख्येश्वर नगर, नालासोपारा (पुर्व) स्टेशन परिसर, नवघर (पुर्व) स्टेशन परीसर, | |
| | ई | नालासोपारा (प) शहर परीसर, गास डोंगरी, भुईगांव, भुईगांव डोंगरी, नाळा, निर्मळ, मर्देस, सोपारा गांव, पाटणकर पार्क, निळेमोरे, एस.टी डेपो रोड | |
| ३ | एफ | प्रभाग समिती (एफ) शहरी परीसर, मांडवी, चांदिप, काशिद कोपर ते वाकण पाडा, वाकण पाडा ते बिलाल पाडा ते शिर्डीनगर | MH ४८ BM ६८९१ |
| | जी | प्रभाग समिती (जी) शहरी परीसर, वालीव व गोखीवरा परिसर, सातिवली व तुंगारेश्वर परिसर, जुचंद, राजवली, ससुनवघर, कामण, चिंचोटी, बापाणे | MH ४८ BM ७२४२ |
| ४ | एच | वसई (प) परिसर, आनंद नगर, नवपाडा, माणिकपुर, दिवाणमान, चुळणा, सनसिटी, अंबाडी, अग्रवाल, पंचवटी, साईनगर, आनंद पार्क, सुयोग नगर, कौलसिटी, राजहंस, स्टेला, कृष्णा कॉम्पलेक्स | MH ४८ BM ६८९२ |
| | आय | वसई शहर परिसर, पापडी, सागरशेत, मुळगांव, पारनाका, किल्ला बंदर, कोळीवाडा, ताम तलाव, वडवली, गिरीज, उमेळा, नायगांव (प), किरवली, चोबारे, सांडोर, कौलारु खुर्द, कौलारु बुद्रुक, सालोली, पाचुबंदर, मांडले, | |

तरी वर नमुद केल्याप्रमाणे महापालिका कार्यक्षेत्रातील ग्रामिण व अंतर्गत भागातील विद्युतीय देखभाल दुरुस्ती कामे करणेंकरिता ६ युटिलिटी वाहने उपलब्ध आहेत. परंतु, प्रभाग समिती "डी", "ई" व "आय" करिता स्वतंत्र वाहन नसल्याने दैनंदिन दिवाबत्ती देखभाल दुरुस्तीची कामे वेळेत पुर्ण करणे शक्य होत नाही. सार्वजनिक दिवाबत्ती तक्रारीचे निवारण वेळेत न झाल्याने सन्मा.सदस्य व नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. याबाबत दि.२०/१०/२०२० रोजी मा.आयुक्त सो., यांचे दालनात माजी सदस्य समवेत झालेल्या चर्चेनुसार प्रभाग समिती "डी" व "जी" करिता १३ मीटर उंचीची १ नविन हायड्रोलिक लॅडर वाहन व प्रभाग समिती "डी", "ई" व "आय" करिता ३ नविन युटिलिटी वाहन उपलब्ध झाल्यास दैनंदिन दिवाबत्ती देखभाल व दुरुस्तीची कामे करणे सोईस्कर होईल.

त्यानुसार दि.२९/१२/२०२० रोजीच्या मा.आयुक्त सो., यांचे आढावा बैठकित दिलेल्या सुचनेनुसार वर नमुद केल्याप्रमाणे नव्याने खरेदी करण्यात आलेल्या ३ युटिलीटी वाहनांवर ११ मी. उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणें यावे. जेणेकरुन खर्चामध्ये बचत होऊन महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होऊ शकतो. तसेच, १३ मीटर उंचीची हायड्रोलिक लॅडर वाहन वाहन विभागामार्फत खरेदी करणेंचे सुचना देणेंत आलेल्या आहेत.

त्यानुसार नव्याने खरेदी करण्यात आलेल्या ३ युटिलीटी वाहनांवर ११ मी. उंचीचे हायड्रोलिक लॅडर व नविन १३ मीटर उंचीची हायड्रोलिक लॅडर-वाहन चेसी सह खरेदी बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-** सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई- विरार शहर महानगरपालिका मालकिच्या दिवाबत्ती विभागाकडील ०३ नग बोलेरो वाहनांवर हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी ई-निविदा प्रक्रिया करणेस तसेच त्याकामी होणाऱ्या अंदाजे रु. ४५,००,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशाकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ३४५ विभाग :- बांधकाम

दिनांक : ११/०१/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मधील वॉर्ड क्र. ९५ मध्ये कौलसिटी येथील माऊंट कारमेल शाळेसमोरील नाल्यावर बॉक्स कल्वर्ट बांधणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड क्र. ९५ मध्ये माऊंट कारमेल शाळेजवळ बॉक्स कल्वर्ट बांधावयाचे आहे. सदर ठिकाणी विकास योजनेमध्ये २०.०० मी. रुंद नाला प्रस्तावीत करणेत आला आहे. सद्यस्थितीत जागेवर ३ फुट व्यासाचा एकच पाईप अस्तित्वात आहे. त्यामुळे पाणी जाण्यास अडथळा होत आहे. चुळणे गावात पूरस्थिती निर्माण होत असल्यामुळे चुळणे गाव ते कौलसिटी ते तांदुळ बाजार ते दत्तानी मॉल पर्यंत डी.पी. मध्ये नाला अस्तित्वात आहे. चुळणे गावातील पाणी उमेळा खाडी मध्ये सोडण्यासाठी नाला वर बॉक्स कल्वर्ट बांधणे आवश्यक आहे.

जागेवर प्रत्यक्ष पाहणी करुन २० X २० मी. रुंदीचे आर.सी.सी. बॉक्सकल्वर्ट चे कामाचे रक्कम रु.१,२१,८६,०६८/-अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. सदर कामामध्ये ४.५० मी चे ४ गाळे प्रस्तावित करणेत आले आहेत. कामाचे सन २०१९-२० चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्य दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब उपरोक्त नमूद ठिकाणी वॉर्ड क्र. ९५ मध्ये कौलसिटी येथील माऊंट कारमेल शाळेसमोरील नाल्यावर बॉक्स कल्वर्ट बांधणे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ अन्वये सदर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांचे मंजूरीसाठी सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मधील वॉर्ड क्र. ९५ मध्ये कौलसिटी येथील माऊंट कारमेल शाळेसमोरील नाल्यावर बॉक्स कल्वर्ट बांधणे कामी अंदाजपत्रकीय रु. १,२१,८६,०६८/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रीया करणेत यावी.

11/1/2021

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ३८६

विभाग :- बांधकाम
दिनांक : ११/०१/२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मधील वॉर्ड क्र. ८५ मध्ये गायत्री मंदिरासमोरील जागेत बॅडमिटन कोर्ट बांधणे

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मधील वॉर्ड क्र. ८५ मध्ये गायत्री मंदिरासमोरील भागात लेआऊट मधील गार्डन प्लॉट आहे.

सदर प्लॉटलगत महापालिकेने आवार भिंत गेटचे बांधकाम केलेले आहे. उद्यानामध्ये परिसरातील नागरीक वापर करीत आहेत. महासभा ठराव क्र. दि. ०६/०४/२०१५ ने रक्कम रु. १,२६,१८,९००/- प्रशासकीय मान्यता घेणेत आली होती. त्यानुसार निविदा प्रक्रिया करणेत आली. परंतु ई निविदा उघडणेबाबत डिजीटल (key) मध्ये तांत्रिक अडचणी झाल्याने निविदा उघडण्यात आलेल्या नाहीत. तरी मागविण्यात आलेल्या निविदा रद्द करुन नव्याने प्रस्ताव तयार करणेत आला आहे.

शहरामध्ये सुसज्ज बॅडमिंटन कोर्ट नसल्यामुळे मुलांची व नागरीकांची गैरसोय होत आहे. जागेवर प्रत्यक्ष पहाणी करुन कामाचे रक्कम रु. २,१३,०७,४८४/- अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. प्रस्तावामध्ये जागेवर ३ बॅडमिंटन कोर्ट, प्रेक्षक, गॅलरी, चेजिंग रुम, टॉयलेट व्यवस्थेसह वुडन फ्लोरींग, स्ट्रक्चरल शेड इ. कामे प्रस्तावित करणेत आले आहे. कामाचे सन २०१९-२० चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभागाची राज्य दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सबब उपरोक्त नमूद ठिकाणी बॅडमिंटन कोर्ट तयार करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ अन्वये सदर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त सो. यांचे मंजूरीसाठी सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'एच' मधील वॉर्ड क्र. ८५ मध्ये गायत्री मंदिरासमोरील जागेत क्रिडासंकुल बांधणेची निविदा रद्द करणे व त्या जागेत नव्याने तयार केलेल्या बॅडमिटन कोर्ट बांधणे कामी अंदाजपत्रकीय रु. २,१३,०७,४८४/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा प्रक्रीया करणेस यावी.

11/1/2021

आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५**
**दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७**
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. :- ३४७ विभाग :- वाहन
दिनांक :- ३१/०३/२०२१

**प्रस्तावाचा विषय :- तरतुदीचे पुनर्विनियोजन करणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर** :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात दररोज सरासरी ६२५ ते ६५० मे. टन कचरा गोळा करुन ५६ कॉम्पेक्टर व ५७ डंम्परव्दारे गोखिवरे येथील क्षेपण भूमीवर जमा करण्यात येतो. क्षेपण भूमीवरील कचरा सपाटी करण्यासाठी व गाडयामधुन उतरलेला कचरा उचलून वरच्या भागात टाकण्यासाठी डोझर व पोकलेनचा वापर करण्यात येतो.

महानगरपालिकेकडे ५५० टन क्षमतेचा कोमात्सु कंपनीचा डोझर असून तो गेल्या ६ महिन्यापासून नादुरुस्त आहे. सदर डोझर सुमारे ३.५० वर्ष जुना असून कचऱ्यामध्ये सारखा वापरामुळे त्याची चैन पूर्णपणे नादुरुस्त झालेली आहे. तसेच मॅकेनिकल भाग सुध्दा नादुरुस्त झालेला आहे.

मा. आयुक्त महोदय यांनी डंम्पिंग ग्राऊंड येथे जाऊन डोझर ची पाहणी केली असता महानगरपालिका मालकिचा डोझर लवकरात लवकर दुरुस्त करणेकामी सुचित केले. त्याअनुषंगाने डोझर दुरुस्तीकामी मागील डोझर दुरुस्ती ठेकेदार यांचेकडून पहाणी केली असता सदर डोझर D८५ ESS कोमात्सु चे असल्याने डोझर दुरुस्तीकामी रक्कम रु. ३४,८२,३९७/- चे अंदाजित दरपत्रक सादर केले. सदरचा खर्च पाहता Dozco India pvt.ltd यांचेकडून आवश्यक ते पार्टस कंपनी उपलब्ध करुन देत आहे. त्यासाठी रक्कम रु. १३,६४,११३/- इतके अंदाजित दरपत्रक सादर झालेले आहे. व त्या पार्टसची ६ महिन्यांची हमी देखील देण्यात आलेली आहे.

उपरोक्त दोनही कंपन्यांचा खर्च पाहता Dozco India pvt.ltd या कंपनीकडून स्पेअर पार्टस खरेदी करणे उचित वाटते. करिता प्रशासकीय ठराव क्र. ७१३ दिनांक १८/०९/ २०२० रोजी महापालिका मालकिचा डोझर तातडीने दुरुस्ती करुन घेणे गरजेचे असल्याने Dozco India pvt.ltd यांचेकडून थेट खरेदी करणेकामी रक्कम रु. १४,००,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्राप्त झाली.

प्राप्त मंजूरीच्या अनुषंगाने Dozco India pvt.ltd यांचेकडून जा.क्र.वविशम/वाहन/ १९२/२० दि. २०/०९/२०२० रोजी स्पेअर पार्टस खरेदीकामी कार्यादेश देणेत आला. कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे स्पेअर पार्टस सुस्थितीत व चांगल्या प्रकारचे पुरवठा केलेला आहे. सदरचे पार्टस बसविण्यासाठी दरपत्रक मागवून अनुभवी मॅकेनिकमार्फत बसविण्यात आले असून डोझर सुरु करण्यात आलेला आहे. व दि. / /२०२० रोजीच्या मा आयुक्त महोदय यांच्या लेखी पत्राव्दारे सदर डोझर स्वच्छता विभागाकडे दुरुस्ती करुन सुस्थितीत सुपूर्द करणेत आलेला आहे.

तरी Dozco India pvt.ltd यांनी स्पेअर पार्टस पुरवठा केलेकामी दि.२३/१०/२०२० रोजी सादर केलेले र.रु. १३,६०,०८९/- चे (सर्व करांसहित) देयक Dozco India pvt.ltd यांनी सादर केलेले आहे.

परंतु साफसफाई वाहन दुरुस्ती व निगा या लेखाशिर्षात अपुऱ्या तरतुदीमुळे सदरचे देयक अदा करावयाचे शिल्लक आहे. करिता वाहन खरेदी व रोडरोलर खरेदी या लेखाशिर्षकामधुन रक्कम रु. १५ लक्ष इतकी तरतुद वर्ग केल्यास सदरचे देयक Dozco India pvt.ltd यांना अदा करणे शक्य होईल.

तरी वाहन खरेदी व रोडरोलर खरेदी या लेखाशिर्षातून साफसफाई वाहन दुरुस्ती व निगा या लेखाशिर्षामध्ये १५ लक्ष रक्कम पूर्नविनियोजन करणेस सदरचा प्रस्ताव मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मालकिचे डोझर दुरुस्ती करुन घेण्यात आलेले आहे. सदर डोझर दुरस्तीकामी झालेल्या खर्चाचे देयक अदा करावयाचे आहे. परंतु **साफसफाई वाहन दुरस्ती व निगा** या लेखाशिर्षांतर्गत अपुऱ्या तरतुदी अभावी सदरचे देयक अदा करणेचे शिल्लक आहे. करिता **"वाहन खरेदी व रोडरोलर खरेदी" या लेखाशिर्षातून "साफसफाई वाहन दुरुस्ती व निगा"** या लेखाशिर्षामध्ये १५ लक्ष इतकी तरतुद पूर्नविनियोजन करणेस याव्दारे अंतिम मान्यता देणेत येत आहे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ३४८ विभाग :- भुयार गटर
दिनांक :- १२/०१/ 2021

---

**प्रस्तावाचा विषय** :- बोळींज येथील मलनि:स्सारण केंद्रातील प्रक्रिया होणाऱ्या पाण्याचे नमुने तपासणीकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार पुर्व-पश्चिम भागासाठी भुयारी गटर योजना राबविण्यात आली असून सदर भुयारी गटर येजनेव्दारे निचरा होणारे पाणी बोळींज येथील मलनि:स्सारण (STP-2) केंद्र येथे प्रक्रिया करणेसाठी येत आहे. सद्य:स्थितीत सदर मलनि:स्सारण केंद्रात 19 ते 20 MLD पाणी प्रक्रियेकरीता येत असून सदर ठिकाणी येणाऱ्या सांडपाण्याचे व प्रक्रियेनंतर प्राप्त होणाऱ्या पाण्याचे नमुने घेऊन ते तपासणीसाठी दर माहे शासकीय प्रयोगशाळा किंवा शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळांकडे पाठवून त्याबाबत येणारे पाण्याचे अहवाल महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे Consent to operate करीता दिलेल्या परवानगीच्या अटी नुसार पाठविणे अनिवार्य आहे.

महापालिका क्षेत्रात शासकीय प्रयोगशाळा उपलब्ध नाही त्यामुळे "इनवायरो ॲनॅलिस्ट ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि., बोरीवली, मुबई" या शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेत सदरचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येत आहेत. याकामी मासिक रू.7000/- इतका खर्च अपेक्षित असून वार्षिक रू.84000/- इतका खर्च अपक्षित आहे महानगरपालिकेच्या सन 2020-21 च्या अर्थसंकल्पात " **यु. आय.डी.एस.एस.टी/ यु. आय.डी. एस एस एम टी योजनेअंतर्गत भुयारी गटार व सॅनिटरी लॅन्डफिल साईट योजना खर्च** " या लेखाशिर्षावर रू.17,02,00,000/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. या भांडवली खर्चाचे लेखाशिर्षावर रक्कम रू. 16,41,16,000/- इतकी तरतुद अद्याप आहे. परंतू सदरचा खर्च हा महसुली खर्चाची बाब असल्याने सन 2020-21 या वर्षाच्या सुधारीत अर्थसंकल्पामध्ये "मलनि:स्सारण केंद्र देखभाल दुरूस्ती खर्च व इतर" या नावे नवीन लेखाशिर्ष तयार करणे व त्यात रू. 1 कोटी इतकी तरतुद करण्याचे अधिन राहून सदरचा खर्च करणे शक्य होईल.

तरी बोळींज येथील मलनि:स्सारण (STP-2) केंद्रामधील मल जलाचे नमुने "इनवायरो ॲनॅलिस्ट ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि., बोरीवली, मुबई" यांच्याकडे पाठविण्यास तसेच सदर कामी येणाऱ्या वार्षिक रू.84,000/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

बोळींज येथील मलनि:स्सारण (STP-2) केंद्रामधील मल जलाचे नमुने "इनवायरो ॲनॅलिस्ट ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि., बोरीवली, मुबई" यांच्याकडे

पाठविण्यास तसेच सदर कामी येणाऱ्या वार्षिक रू.84,000/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे सविनय सादर.

---

**ठराव :-** बोळींज येथील मलनि:स्सारण (STP-2) केंद्रामधील मल जलाचे नमुने मासीकरित्या तपासणीसाठी मे. इनवायरो ॲनॅलिस्ट ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि., बोरीवली, मुबई या शासन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेत पाठविण्यास व त्याअनुषंगाने होणाऱ्या वार्षिक रू. 84,000/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**(गंगाथरन डी.)भा.प्र.से.**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

2

# वसई-विरार शहर महानगरपालिका


मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र. ३४९ विभाग: भांडार विभाग

दिनांक : १२/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषयः- सामान्य प्रशासन व वसुलीचा खर्च अंतर्गत सामान्य प्रशासन समुह भ्रमण ध्वनी या लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजन प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजासाठी कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना संपर्कासाठी व कामे जलदगतीने होण्यासाठी मोबाईल सीम कार्ड देण्यांत आलेले आहे व त्यांचे येणारे मासीक देयक महानगरपालिके कडून अदा केले जाते. त्यानूसार महानगरपालिका सन २०१९.२० च्या सुधारीत अर्थसकंल्पात सन २०२०.२१ च्या सुधारीत अर्थसंकल्पात सन २०२०.२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सामान्य प्रशासन समुह भ्रमणध्वनी लेखार्शिर्ष अंतर्गत ४ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. त्यापैकी आतापर्यंत ३,९६,८५२/- इतका खर्च झालेला असून रक्कम रु. ३,१४८/- इतकी शिल्लक आहे. माहे डिसेंबर २०२० चे भ्रमणध्वनी देयक रक्कम रु. ३१,७४६/- इतकी आहे. त्याप्रमाणे माहे जानेवारी २०२१ ते माहे मार्च २०२१ या पुढील तीन महिन्याकरिता अंदाजे २ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

सन २०१९.२० च्या सुधारित अर्थसंकल्पात सन २०२०.२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सामान्य प्रशासन नविन झेरॉक्स मशिन (खरेदी) दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत २८ लक्ष २५ हजार इतकी तरतुद असून आतापर्यंत ४९,९२०/- इतका खर्च झालेला असून रक्कम रु. २७,७५,०८०/- इतकी शिल्लक आहे.

तरी सामान्य प्रशासन नविन झेरॉक्स मशिन (दुरुस्ती) खरेदी या लेखाशिर्षातून २ लक्ष इतकी रक्कम सामान्य प्रशासन समुह भ्रमणध्वनी या लेखाशिर्षकामध्ये पुर्नविनियोजन करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

कमी पडणाऱ्या तरतुदीचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे सादर.

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजूर तरतुद | आवश्यक तरतुद (वाढीव तरतुद) |
|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन समुह भ्रमण ध्वनी | रु. ४,००,०००/- | रु. २,००,०००/- |

**ठरावः-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजासाठी कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना संपर्कासाठी व कामे जलदगतीने होण्यासाठी मोबाईल सीम कार्ड देण्यांत आलेले आहेत. त्याकामी येणारे देयक सामान्य प्रशासन समुह भ्रमणध्वनी या लेखाशिर्षामधून अदा करण्यात येते. सदर लेखाशिर्षामध्ये तरतुद रक्कम रु. ३,१४८/- इतकीच शिल्लक असल्याने सामान्य प्रशासन नविन झेरॉक्स मशिन (खरेदी) दुरुस्ती या लेखाशिर्षामधुन रक्कम रु. २ लक्ष महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ च्या नियम ३०(३) नमुना १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे सामान्य प्रशासन समुह भ्रमणध्वनी या लेखाशिर्षामध्ये पुन: विनियोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

२

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** २५०

विभागः भांडार विभाग
दिनांक : १२/०६/२०२१

**प्रस्तावाचा विषय:- कोविड-१९ उपचार केंद्रावर रुग्णांकरिता पिण्याचे पाणीसाठी आर.ओ.वॉटर फिल्टर खरेदी करणेकामी येणा-या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय वित्तीय मंजुरीबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेने शहरामधील कोविड-१९ रुग्णांवर उपचार करण्यासाठी १) कौल सिटी २) अग्रवाल हॉस्पिटल येथे रुग्णालये तयार केलेली आहेत.

सदर रुग्णालयामध्ये रुग्ण व रुग्णालयामधील कर्मचारी यांना पिण्याचे पाणी उपलब्धतेसाठी ९ लिटरचे आर.ओ.वॉटर मशिन बसविलेली आहेत. परंतू रुग्णालयातील पाण्याचा वापर जास्त असल्याने व मशिनच्या क्षमतेपेक्षा जास्त लोड असल्याने आ.ओ.वॉटर फिल्टर वारंवार बंद होतात व त्याचे फिल्टर मेमरन इत्यादी बदलावे लागतात.

उपलब्ध असलेले आर.ओ.वॉटर फिल्टरची क्षमता कमी असल्याने १०० लिटर कमर्शिअल लावल्यास वारंवार देखभाल दुरुस्ती करावी लागणार नाही तसेच पिण्याचे पाणी समस्या उद्‌भवणार नाही. त्याकरीता खालील प्रमाणे आर.ओ.वॉटर फिल्टर बसविल्यास खर्च येईल.

| अ.क्र | ठिकाण | क्षमता | आवश्यक नग | दर प्रति नग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | कौल सिटी कोविड-१९ | १०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | १०५००० | १०५००० |
| | | ५०० लिटर | टँक - १ नग | ६३०० | ६३०० |
| | | | पाईप फिटीग | ८००० | ८००० |
| २. | अग्रवाल हॉस्पिटल | १०० लिटर | आर.ओ.वॉटर - १ नग | १०५००० | १०५००० |
| | | ५०० लिटर | टँक - १ नग | ६३०० | ६३०० |
| | | | पाईप फिटीग | ८००० | ८००० |
| | | | स्टँड | २५०० | २५०० |
| | | | | **एकूण** | **२४११००** |
| | | | | **१८%GST** | **४३३९८** |
| | | | | **एकूण** | **२,८४,४९८/-** |

तसेच सदरचा खर्च सन २०२०-२१ मधील सामान्य प्रशासन विभाग अंतर्गत सामान्य प्रशासन अंतर्गत फर्निचर / वॉटर कुलर इ. या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल.

तरी उपरोक्त आर.ओ.वॉटर फिल्टर कौल सिटी कोविड-१९, अग्रवाल हॉस्पिटल उपचार केंद्र येथे खरेदी करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेले अधिकारानुसार विना निविदा पूरवठादार मे. रोहन नाईक यांचेकडून तात्काळ थेट खरेदीस करुन झालेल्या

रक्कम रु. २,८४,४९८/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव** :- सदर साहित्य कोविड-१९ प्रतिबंधक उपाययोजनेकरिता आवश्यक आहे. तरी उपरोक्त प्रस्तावा मधील वरील आर.ओ.वॉटर फिल्टर तात्काळ पूरवठादार मे. रोहन नाईक हयाच्यांकडून विना ई निविदा खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार कोविड-१९ रुग्णांकरिता आर.ओ.वॉटर फिल्टर खरेदी करणेकामी झालेल्या रक्कम रु. २,८४,४९८/- (अक्षरी रुपये दोन लक्ष चौऱ्याऐंशी हजार चारशे अठ्ठयाण्णव मात्र) खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका